
रायगड, नवी मुंबई
• वर्ष १८ • अंक ११३
www.ramprahar.com
# राम प्रहर
• सोमवार, १० नोव्हेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## पुन्हा हवामान बदल; कुठे पाऊस, तर कुठे थंडी पडणार



**नवी दिल्ली :** आता पुन्हा एकदा संपूर्ण भारतात हवामान बदलण्याची शक्यता आहे. पुढील चार दिवस तामिळनाडू आणि पुडुचेरीमध्ये काही ठिकाणी मध्यम ते काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळमध्येदेखील पुढील दोन दिवस मेघगर्जनेसह जोरदार पावसाची शक्यता आहे, तर इतर भागांमध्ये तापमानात घट होऊन थंडी पडणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील काही दिवस मध्य प्रदेश, झारखंड, छत्तीसगड, दक्षिण हरियाणा आणि महाराष्ट्रात सरासरी तापमान हे दोन ते चार अंश सेल्सिअसने कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या राज्यात थंडीचा जोर वाढू शकतो, तर पूर्वोत्तर भारतामध्ये थंडी आणि पाऊस असे दोन्ही वातावरण बघायला मिळू शकते, अशी माहिती भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आली आहे.

## अंतरंग

पनवेल मोहोचापाडा येथे विकासकामांचा शुभारंभ/३
कर्जतमधील आदिवासी युवक एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण/५
ध्रुव जुरेलची पुन्हा दमदार शतकी खेळी/८

# महाराष्ट्र हे भारताचे खरे स्टार्टअप कॅपिटल

## ■ मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; इनोव्हेशन महाकुंभचे उद्घाटन



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतातील सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे स्टार्टअप कॅपिटल असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५'चे उद्घाटन रविवारी (दि. ९) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. त्या वेळी ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटन समारंभास राज्याचे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. या वेळी मुख्यमंत्र्यांनी येथील प्रदर्शनाची पाहणी करून सर्व नवोन्मेषकांचे अभिनंदन केले.

# भाजप जनसंपर्क कार्यालयातून नागरिकांचे प्रश्न सुटतील

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा विश्वास





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील तळोजामध्ये भारतीय जनता पक्षाच्या विजयश्री पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन रविवारी (दि. ९) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी बोलताना त्यांनी येथे देशाच्या कानाकोपऱ्यातून नागरिक राहायला आले असून वाढत्या लोकसंख्येत सर्वांच्या अडचणींना दिशा देण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमास भाजप पनवेल पूर्व मंडळाचे अध्यक्ष दिनेश खानावकर, निर्दोष केणी, शक्ती केंद्रप्रमुख संतोष पाटील, भाजपचे प्रभाग क्रमांक १चे अध्यक्ष दीपक पाटील, गोपीनाथ पाटील, सुनील पाटील, सरस्वती पाटील, माजी नगरसेवक संतोष भोईर, सुरेश पोरजी, नंदूशेठ म्हात्रे, नंदूशेठ भोपी, विजय पवार, बाळाराम पाटील, मदन पाटील दिनकर पाटील, कैलास धावणे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तळोजा परिसरात नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जावेत आणि त्यावर योग्य तो तोडगा मिळावा या उद्देशाने हे कार्यालय कार्यरत राहणार असल्याचे सांगितले. शासकीय, कोर्टकचेरी किंवा स्थानिक पातळीवरील कोणत्याही समस्यांवर मार्गदर्शन आणि सहाय्य करण्यासाठी हे कार्यालय नागरिकांचे हक्काचे केंद्र ठरेल. तळोजासारख्या जलदगतीने वाढणाऱ्या भागात अशा जनसंपर्क कार्यालयाची आवश्यकता होती, असेही त्यांनी नमूद केले. **(पान २ वर..)**

# बस दरीत कोसळून दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू



**नंदुरबार : प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्यातील देवगुई घाट परिसरात आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी बस दरीत कोसळून दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू, तर अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. अक्कलकुवा तालुक्यातील अमलीबारीजवळ रविवारी (दि. ९) हा भीषण अपघात झाला.

अपघातग्रस्त विद्यार्थी जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे आश्रमशाळेचे आहेत. दिवाळीच्या सुट्ट्या संपल्याने गावात आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत नेण्यासाठी बस अक्कलकुव्याच्या मोलगी परिसरात आली होती. विद्यार्थ्यांना घेऊन परतत असताना देवगुई घाटात वाहकाचे नियंत्रण सुटल्याने बस ८० ते शंभर फुट दरीत कोसळली. अपघातानंतर स्थानिकांनी दरीत जाऊन मदतकार्य केले. जखमी विद्यार्थ्यांना बाहेर काढून अक्कलकुवा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. यातील दोन ते तीन विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जाते.

# तीन दहशतवाद्यांना अटक

**अहमदाबाद :** गुजरात दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि केंद्रीय तपास यंत्रणांनी संयुक्त अभियान राबवत तीन दहशतवाद्यांना अहमदाबादच्या अडालज येथून अटक केली आहे. या दहशतवाद्यांमध्ये चीनमधून एमबीबीएस शिक्षण घेतलेला ३५ वर्षीय डॉ. अहमद मोहिउद्दीन सैय्यद याचा समावेश आहे, जो इसिस'शी निगडीत परदेशात बसलेल्या कट्टरपंथींसोबत संपर्कात होता.

अहमदसोबत त्याचे दोन साथीदार मोहम्मद सुहेल आणि आझाद सैफी यांनाही अटक करण्यात आली आहे. हे तिघे अहमदाबाद, लखनऊ आणि दिल्लीत दहशतवादी हल्ला करण्याच्या तयारीत होते. एटीएसने दिलेल्या माहितीनुसार हे तिन्ही दहशतवादी 'रायजिन' नावाचे अत्यंत विषारी द्रव तयार करत होते. अधिकाऱ्यांच्या मते, हे पदार्थ सायनाइडपेक्षाही जास्त प्राणघातक आहे. थोड्या प्रमाणातही मोठ्या प्रमाणात जीवितहानी होऊ शकते. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## निवडक

### पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्यापासून भूतान दौऱ्यावर

**नवी दिल्ली :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवार (दि. ११)पासून दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक हे पुनात्सांगचु-२ या जलविद्युत प्रकल्पाचे उद्घाटन करतील. भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे हा प्रकल्प विकसित केला आहे.

### आकाश चौधरीचे सलग आठ षटकारांसह विक्रमी अर्धशतक

**सुरत :** मेघालयच्या आकाश चौधरीने आठ चेंडूंवर आठ षटकार मारण्याचा अभूतपूर्व पराक्रम करत प्रथम-श्रेणी क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतक ठोकले. लागोपाठ सहा षटकार ठोकत प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहासात अशी कामगिरी करणारा तो केवळ तिसरा फलंदाजही ठरला. यापूर्वी वेस्ट इंडिजचे गॅरी सोबर्स आणि भारताचे रवी शास्त्री यांनी असा पराक्रम गाजवला आहे. **(पान ८ वर..)**

# आरएसएसचे काम निस्पृह भावनेने -सरसंघचालक भागवत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला (आरएसएस) १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. संघासाठी हे मार्गक्रमण सोपे नव्हते. निस्पृह भावनेने स्वयंसेवक आणि संघ काम करत राहिला. त्यामुळेच लोकांच्या मनांमध्ये आपण विश्वास निर्माण करू शकलो, असे सरसंघचालक मोहन भागवत यांनी म्हटले आहे. बंगळुरू येथील परिषदेत बोलताना त्यांनी आरएसएसच्या वाटचालीचा आढावा सादर केला.

सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० वर्षांतील ६० ते ७० वर्षे ही संघर्षाची आणि तीव्र विरोध सहन करायला लावणारी होती. संघावर दोनवेळा बंदी घातली गेली आणि स्वयंसेवकांवर टीका झाली, हल्लेही झाले. एवढेच नव्हे तर स्वयंसेवकांच्या हत्या झाल्या. आपला विस्तार होऊ नये यासाठी हरतऱ्हेने प्रयत्न झाले, मात्र स्वयंसेवकांनी ते होऊ दिले नाही.

विविध जाती संप्रदायाचे, धर्माचे, पंथाचे मग ते ब्राह्मण असोत, मुस्लिम असोत की ख्रिश्चन कुणीही संघात येऊ शकते, पण तुम्ही संघात आलात की तुम्ही हिंदू आहात, भारतमातेचे पुत्र आहात ही भावना हवी. मी अमक्या समाजाचा आहे, मी तमक्या जातीचा आहे, मी अमुक धर्माचा आहे ही भावना तुमच्या मनात अजिबात यायला नको. ती बाहेर ठेवून शाखेत यायचे असेल, संघात सहभागी व्हायचे असेल तर आनंदाने या, असे सांगून मुस्लिम, ख्रिश्चन धर्माचे लोकही संघात आहेत. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदू समाजात इतर जात आणि धर्म यांचाही समावेश होतो, असे सरसंघचालक भागवत म्हणाले.

## बिहार निवडणूक; प्रचारतोफा थंड

**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या व शेवटच्या टप्प्यात २० जिल्ह्यांमधील १२२ जागांसाठी मतदान होणार आहे. त्याचा जाहीर प्रचार रविवारी (दि. ९) संध्याकाळी संपला आहे. ११ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. शेवटच्या दिवशी सर्व पक्षांच्या नेत्यांनी आपल्या भाषणांमधून मतदारांना शेवटची साद घातली.

पहिल्या टप्प्यात १२१ जागांसाठी ६ नोव्हेंबरला मतदान झाले. आता दुसऱ्या टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडून सर्व २४३ जागांचा निकाल १४ नोव्हेंबर रोजी जाहीर होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात ३७ दशलक्षाहून अधिक मतदार १,३०२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य ठरवतील.

# नगर परिषद निवडणूक : आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात १० नगर परिषदांसाठी राज्य निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यात खोपोली, कर्जत अलिबाग, महाड, माथेरान, मुरूड जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन, उरण पालिकांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी सोमवार (दि.१०)पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे.

या नगर परिषदांचा कार्यकाळ २०२१मध्ये संपला होता, मात्र कोरोना, ओबीसी आरक्षण यांसारख्या कारणांमुळे गेली चार वर्ष निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. त्यामुळे या सर्व पालिकांवर प्रशासक कार्यरत होते. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी २०२६पूर्वी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य निवडणुक आयोगाने नगर परिषद व नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यात रायगड जिल्ह्यातील १० नगरपालिकांचा समावेश आहे.

रायगडातील १० नगरपरिषदांमध्ये १०७ प्रभाग असून २१७ सदस्य निवडून द्यायचे आहेत. ३०८ मतदान केंद्रांवर मतदान घेण्यात येणार आहे. निवडणुकीत दोन लाख ३७ हजार ५०३ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जिल्ह्यात खोपोली ही एकमेव ब वर्ग नगर परिषद, तर उर्वरित नऊ नगर परिषदा क वर्गाच्या आहे. खोपोलीमध्ये सर्वाधिक ६२ हजार ७४ मतदार आहेत. तेथे ३१ सदस्य निवडून येणार आहेत. त्या खालोखाल पेणमध्ये २४, तर उरण व कर्जतमध्ये प्रत्येकी २१ सदस्य निवडून येणार आहेत. याशिवाय अलिबाग, श्रीवर्धन, मुरूड, रोहा, महाड, माथेरान या नगर परिषदांमध्ये प्रत्येकी २० सदस्य निवडले जाणार आहेत.

# गारेगार वातावरणात मुरूड पर्यटकांनी बहरले

**मुरूड : प्रतिनिधी**

निसर्गरम्य मुरूडमध्ये थंडीचे वातावरण निर्माण झाल्याने पर्यटक येथील समुद्र किनारी येणे पसंत करत आहेत. सध्या समुद्र शांत असल्याने मासेमारी चांगली होत असून पर्यटकांना ताजे मासे खाण्याचा आस्वादही घेता येत आहे.

दिवाळीपासून पर्यटन हंगाम सुरू झाला खरा, पण पाऊस पडत असल्याने पर्यटकांचा हिरमोड झाला होता. त्यातच खराब हवामानामुळे जंजिरा किल्लाही बंद ठेवण्यात आला होता. अखेर पावसाने निरोप घेतल्यानंतर मुरूडमध्ये पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे.

सध्या थंडी पडू लागल्याने मुरूडमध्ये वातावरण आल्हाददायक बनले आहे. समुद्र किनारी रोषणाई, चविष्ट पदार्थांचे स्टॉल, खास मांसाहारी जेवणासाठी हॉटेल्स तसेच घोडेस्वारी, मोटर बाईक राईड उपलब्ध आहे.

नगरपालिकेने समुद्रकिनारी असलेल्या विश्राम धामबागेचे नूतनीकरण केले आहे. पार्किंग झाल्याने पर्यटक गाडी पार्क करून समुद्रस्नानाचा आनंद घेऊ शकतात. शिवाय, मुरूडपासून जवळच असणारे गारंबी धरण, कुडे मांदाड लेणी, खोकरी घुमट, दत्त मंदिर येथेही फिरायला जाता येते. एकंदर नव्या हंगामात पर्यटकांसाठी मुरूड तालुका सज्ज झाला आहे.

**मुरूड शहरात रस्ते, पिण्याचे पाणी, समुद्र किनारी स्वच्छता याकडे जातीने लक्ष दिले जात आहे. पर्यटकांनी येथे आवर्जून यावे, मात्र समुद्रात जाताना भरती-ओहोटी याचे भान ठेवून समुद्रस्नानाचा सुरक्षितपणे आनंद घ्यावा.**
**-सचिन बच्छाव,** मुख्याधिकारी

**मध्यंतरी कोरोनामुळे हॉटेल व्यवसाय डबघाईला आला होता. यावर्षी दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये चांगली बुकिंग झाली. असेच पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात मुरूडला यावे. आम्ही त्यांना उत्तम सेवा देऊ.**
**-मनोहर बैले,** हॉटेल व्यावसायिक



# आदईचे शेकाप उपसरपंच विलास शेळके भाजपमध्ये



## समर्थकांनीही हाती घेतले 'कमळ'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलजवळील आदई ग्रुप ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच व शेकापचे नेते विलास शेळके यांनी आपल्या समर्थकांसह शनिवारी (दि. ८) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी पक्षाची शाल देऊन त्यांचे स्वागत केले.

पनवेल शहरातील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, यतीन पाटील, अंकुश ठाकूर, भाईशेठ पाटील, सदाशिव पाटील, बाळाराम पाटील, एकनाथ मोकल आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, भाजप हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असून कार्यकर्तेच पक्षाचा कणा आहेत, असे सांगून विलास शेळके यांच्यासारखे कार्यकर्ते पक्षाची ताकद वाढवतात आणि कार्यकर्त्यांवर चालणारा पक्ष हीच भाजपची ओळख आहे, असे म्हटले.

या वेळी आदईचे उपसरपंच विलास शेळके यांच्यासह शेकापचे ज्येष्ठ नेते परशुराम शेळके, दीपक शेळके, विजय पाटील, संतोष म्हात्रे, राजेंद्र शेळके, दिनेश शेळके, नवनाथ पारिंगे, शेकाप उत्तर भारतीय सेलचे चंद्रशेखर चौहान, कमलेश चौहान, अजित चौहान, अमित चौहान, हिरालाल चौहान, रामचंद्र वर्मा, बापू केजळे, अविनाश देसाई, राजेंद्र राजे, किशोर भंडारी, ज्ञानदेव मोरे, संजय मोरे, विजय पंजाबी आदी कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सर्वांचे स्वागत करण्यात आले.

# खोपोली नगरपालिका निवडणुकीसाठी एकदिलाने काम करा -आमदार प्रशांत ठाकूर

**खोपोली : प्रतिनिधी**

आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी एकदिलाने व संघटितपणे प्रयत्न करावे, असे आवाहन भाजपचे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. भाजपच्या खोपोली मध्यवर्ती कार्यालयाच्या कार्यकर्त्यांच्या अनौपचारिक बैठकीनिमित्त ते खोपोली येथे आले होते. त्या वेळी त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले.




येत्या दोन-तीन दिवसात उमेदवारांच्या निवडी होतील. त्याचप्रमाणे युती आघाड्यांबद्दल पक्षाची भूमिका स्पष्ट होणार आहे असे या वेळी त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांनी आपापसातील भेद दूर करून एकत्रितपणे पक्षाची ताकद दाखवण्याची वेळ आली आहे. लवकरच तीन चार दिवसांत पक्षप्रवेश सोहळासुद्धा खोपोलीत होणार आहे, कार्यकर्त्यांनी वरिष्ठांच्या संपर्कात राहून समन्वय साधून काम करायचे आहे पंतप्रधान मोदी यांच्या याचप्रमाणे राज्यातील फडणवीस सरकारच्या कार्यप्रणालीवर जनसामान्यांलहळ सकारात्मक भूमिका असून ती भूमिका आता मतपेटीतून व्यक्त करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे निश्चितच पक्षाला आगामी निवडणुकीत जनतेचा भरघोस पाठिंबा मिळेल यात शंका घेण्याचे कारण नसल्याचे त्यांनी सांगितले. कार्यकर्त्यांनी वरिष्ठांच्या संपर्कात राहून समन्वय साधून काय करायचे आहे याबाबत अवश्य विचार करून आतापासूनच कामाला लागावे, असे आवाहन केले.



यावेळी रायगड जिल्हा उत्तर अध्यक्ष अविनाश कोळी यांनीही पक्षाच्या आगामी कार्यक्रमास संदर्भात माहिती दिली. वंदे मातरम गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर सर्व ठिकाणी कार्यक्रम चांगल्या पद्धतीने पार पडले याबद्दल त्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले.

या अनौपचारिक बैठकीला जिल्ह्याचे सरचिटणीस प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, खोपोली प्रभारी सुनील घरत, त्याचप्रमाणे जिल्ह्याचे पदाधिकारी तसेच खोपोली शहर अध्यक्ष अजय इंगुलकर, खोपोली निवडणूक प्रमुख यशवंत साबळे, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, महिला अश्विनी अत्रे यासह पक्षाचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच बैठकीत युवा कार्यकर्ते मीतेश शहा यांचे वाढदिवसानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले.

## सर्वोत्कृष्ट जनसंपर्कासाठी महापारेषणचा जागतिक पातळीवर गौरव

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) सामाजिक उत्तरदायित्व व प्रभावी जनसंपर्क क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. वर्ल्ड इनोव्हेशन अँड चेंज मॅनेजमेंट इन्स्टिटयूटच्या वतीने महापारेषणला पीआरओ पीआर ग्लोब सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कम्युनिकेशन अचिव्हमेंट अवॉर्ड्स-२०२५ या आंतरराष्ट्रीय पुरस्कारांतर्गत सर्वोत्कृष्ट मानाचा पुरस्कार जाहीर केला आहे.

या पुरस्काराचे वितरण २८ जानेवारी २०२६ रोजी रोम (इटली) येथे होणाऱ्या पीआरओ पीआर रोमन फोरमत्र्र या आंतरराष्ट्रीय परिषदेत होणार आहे. या वर्षी सहा खंडांतील एकूण ७६ आंतरराष्ट्रीय परीक्षकांनी विविध संस्थांच्या संवाद, सामाजिक उत्तरदायित्व व जनसंपर्क प्रकल्पांचे मूल्यांकन केले. त्यामध्ये महापारेषणला 'सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कम्युनिकेशन अचिव्हमेंट' या श्रेणीत जगातील अव्वल तीन संस्थांमध्ये स्थान मिळाले आहे.

या पुरस्कारासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही, ही या पुरस्काराची महत्त्वपूर्ण बाब आहे. हा उपक्रम क्रोएशियातील अप्रिओरी वर्ल्ड एजन्सीव्दारे गेल्या १४ वर्षांपासून आयोजित केला जातो.

या एजन्सीला चार प्रमुख जागतिक जनसंपर्क संघटनांचे पीआरसीए (पब्लिक रिलेशन्स अँड कम्युनिकेशन्स असोसिएशन), आयपीआरए (इंटरनॅशनल पब्लिक रिलेशन्स असोसिएशन), सीआयपीआर (चार्टर्ड इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक रिलेशन्स) आणि आयसीसीओ (इंटरनॅशनल कम्युनिकेशन्स कन्सल्टन्सी ऑर्गनायझेशन) सहकार्य लाभले आहे.

सामाजिक, पर्यावरणीय आणि संवाद क्षेत्रातील सकारात्मक, पारदर्शक आणि नवोन्मेषी उपक्रमांची जागतिक पातळीवर नोंद घेणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, हा या पुरस्काराचा हेतू आहे.

महापारेषणच्या या आंतरराष्ट्रीय सन्मानामुळे महाराष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्रातील संवाद, सामाजिक जबाबदारी आणि प्रभावी जनसंपर्काची दखल जागतिक स्तरावर घेतली गेली आहे. हा पुरस्कार कंपनीच्या नवोन्मेषी दृष्टिकोनाचे आणि कार्यसंघाच्या संयुक्त प्रयत्नांचे प्रतीक आहे.

## गुरू नानक जयंतीनिमित्त पाली येथे नगर कीर्तन

**पाली : रामप्रहर प्रतिनिधी**

गुरुनानक देवजींच्या गुरुपुरबच्या पवित्र दिनानिमित्त आज, दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी पाली येथे भव्य नगर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. मुंबई, पनवेल, माणगाव तसेच रायगड जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून मोठ्या संख्येने सिख समाजातील भाविकांनी या नगर कीर्तनात उत्साहाने सहभाग नोंदविला.

सकाळी गुरु ग्रंथ साहिबजींची प्रकाश स्थापना करून कीर्तनाची सुरुवात झाली. नगर कीर्तनाची भव्य पालखी पाली येथून सुरू होऊन गुरुद्वारा गुरु नानक दरबार येथे संपन्न झाली. मार्गात संगतांनी सतनाम वाहेगुरु ,धन गुरु नानक धन गुरुनानक ,वाहेगुरु जी का खालसा, वाहेगुरु जी की फतेह या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. विविध ठिकाणी स्थानिक नागरिकांनी फुलवर्षाव, आरती आणि प्रसाद वाटप करून स्वागत केले.

## संकष्ट चतुर्थीनिमित्त महड येथे भाविकांची मांदियाळी

**चौक : प्रतिनिधी**

संकष्ट चतुर्थीच्या निमित्ताने अष्टविनायक क्षेत्र पैकी महड येथे वरद विनायकाचे दर्शन घेण्यास भाविकांची मांदियाळी झाली होती.



मुंबई, रायगड, पुणे, नवी मुंबई, ठाणे परिसरातून भक्त येऊन दर्शन घेत होते, पहाटेपासूनच रांगा लागल्या होत्या. शाळांच्या सहली देखील होत्या. उद्यापासून शाळा सुरू होत आहेत, त्यामुळे अनेक भक्त आपल्या मुलांना घेऊन गणरायाचे दर्शन घेण्यासाठी आलेले दिसत होते.सोमवारी शाळा सुरु होणार असल्याने अनेक भाविक दर्शन घेऊन लोणावळा येथे परिवारासहित फिरण्यासाठीदेखील गेले,

# 'अमृत'तर्फे मोफत ड्रोनपायलट प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवक-युवतींसाठी महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी (अमृत) तर्फे मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करून युवकांना रोजगारक्षम बनविणे आणि स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे हे या उपक्रमामागचे प्रमुख उद्दिष्टआहे.

या अंतर्गत १० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार असून उमेदवारांना नागरिक उड्डाण महासंचालनालय (डीजीसीए) मान्यता प्राप्त प्रमाणपत्र दिले जाणार आहे. या प्रशिक्षणानंतर उमेदवारांना अधिकृत दूरसंवेदन पायलट परवाना मिळणार असून, कृषी, सर्वेक्षण, छायाचित्रण, चित्रफितनिर्मिती, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, शेतीमध्ये फवारणी व तपासणी अशा विविध क्षेत्रांत रोजगार आणि व्यवसायाच्या नव्या दिशा खुल्या होतील.

प्रशिक्षणामध्ये मध्यम वर्ग ड्रोन प्रशिक्षण, लघु वर्ग ड्रोन प्रशिक्षण, प्रशिक्षक प्रशिक्षण, कृषी क्षेत्रातील ड्रोन वापर, वाहतूक आणि आपत्ती व्यवस्थापनातील ड्रोन वापर, नकाशांकन व सर्वेक्षण, ड्रोन देखभाल आणि सेवा प्रशिक्षण तसेच छायाचित्रण व चलचित्र निर्मिती प्रशिक्षण अशा एकूण आठ प्रकारचे अभ्यासक्रम समाविष्ट आहेत. प्रत्येक तुकडीत १५ विद्यार्थ्यांचा समावेश असेल. हे प्रशिक्षण रायगड पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, कोल्हापूर आणि परभणी या केंद्रांवर आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणासाठी अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर प्राथमिक पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

या योजनेचा लाभ खुल्या प्रवर्गातील अशा समाजांना दिला जाणारआहे, ज्यांना कोणत्याही शासकीय महामंडळ किंवा संस्थेकडून समकक्ष योजना मिळत नाही. यामध्ये ब्राह्मण, मारवाडी, माहेश्वरी, गुजराती, सिंधी, राजपूत, कोमटी, पटेल, बंगाली, ठाकूर, पाटीदार आदी समाजांचा समावेश आहे. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावेत, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा कमी असावे आणि शैक्षणिक पात्रता किमान दहावी उत्तीर्ण असावी.अर्जदारांनी ओळखपत्र, अधिवास प्रमाणपत्र, चालू आर्थिक वर्षाचे उत्पन्न प्रमाणपत्र, फिटनेस दाखला तसेच शैक्षणिक पात्रतेचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. इच्छुक उमेदवारांनr www.mahaamrut.org.in, या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. अर्जाची छापील प्रत सर्व कागदपत्रांसह स्वाक्षरीसह अमृतसंस्थेच्या अथर्व कॉम्प्लेक्स, जिल्हा कार्यालयात सादर करावी.

## पावसाने घेतली विश्रांती; रोह्यात भात झोडणीला वेग!



**रोहा : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कपाळावर चिंता उमटली होती. आधीच पिके तयार असूनही पावसाच्या सरींनी कापणी आणि झोडणीचं काम थांबवून ठेवलं होतं. मात्र गेल्या दोन दिवसांपासून पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे पुन्हा एकदा शेतात जीवंतपणा आला आहे. तर धाटाव, कोलाड, खांब, पुगाव, किल्ला, घोसाळे, चणेरा, भालगाव, यशवंतखार, तांबडी, वाली यांसारख्या गावांमध्ये भात झोडणीला आता वेग आला असून सर्वत्र ओलसर मातीचा सुगंध आणि धान्याचा सुवास पसरला आहे. शेतकरी सकाळच्या पहाटेपासून संध्याकाळपर्यंत शेतात राबत आहेत. दांडी, पिंप आणि वाऱ्याच्या झुळकीत झोडल्या जाणाऱ्या धान्याचा सोनेरी पाऊस पाहून त्यांच्या डोळ्यांतील थकवा हरवतोय.

पावसाचं थैमान थांबल्यानंतर ग्रामीण भागात पुन्हा एकदा आशेचा किरण दिसू लागला आहे. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य उमटलं आहे. मेहनतीच्या घामातून उमलणारं हे सोनं म्हणजे त्यांच्या वर्षभराच्या परिश्रमाचं खऱ्या अर्थाने 'सोनेरी फळ' ठरत आहे. हवामान असंच खुलं राहिल्यास या हंगामात शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचं सोनं हातात पडेल, अशी आशा तालुक्यात व्यक्त होत आहे.

गेल्या आठवड्यात सततच्या पावसाने भात सडण्याची भीती वाटत होती. पण आता हवामान खुलं झालंय, त्यामुळे झोडणीला सुरुवात केली. उरलेलं कष्टाचं सोनं वाचवायला मिळालं हेच आमचं समाधान, असं लांडर गावचे शेतकरी संकेत खेरटकर सांगतात,

## नेरळ रेल्वेस्थानकातील सरकता जिना प्रवाशांच्या सेवेत

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ स्थानकात मध्य रेल्वे प्रशासनाकडून फलाट एक वर सरकता जिना उभारण्यात आला आहे. या सरकत्या जिन्याचे काम अनेक महिने रखडले होते. अखेर हा सरकता जिना प्रवासी वर्गाच्या सेवेत आला असून नेरळ प्रवासी संघटना यांनी त्याबद्दल आभार मानले आहेत. तर जेष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी ही मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.



नेरळ स्थानकात विविध विकास कामे मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून सुरु आहेत. त्यातील महिला प्रवासी आणि जेष्ठ नागरिक अशा प्रवासी यांचेसाठी अत्यंत महत्वाचा समजला जाणारा सरकता जिना अखेर प्रवासी वर्गाच्या सेवेत आला आहे. गेली एक वर्षे उभारण्यात येत असलेल्या सरकता जिनाचे बांधकाम ठप्प होते. याबाबत माध्यमांनी आवाज उठवल्यावर मध्य रेल्वे प्रशासन आणि मुंबई रेल कोर्पोरेशन यांना जाग आली.

मुंबई येथून येणारे पर्यटक प्रवासी यांच्यासाठी हा सरकता जिना महत्वाचा असल्याने या सरकत्या जीन्याचे काम पूर्ण व्हावे. यासाठी नेरळ प्रवासी संघटना देखील सतत पाठपुरावा करीत होती.माथेरान येथे जाण्यासाठी येणारे पर्यटक याच स्थानकात मोठ्या संख्येने उतरत असतात आणि त्यामुळे प्रवाशांसाठी हा सरकता जिना महत्वाचा समजला जात होता

नेरळ स्थानकात आणखी दोन ठिकाणी सरकते जिने बसावेत आणि त्यात फलाट दोन वर एक सरकता जिना बसवावा अशी मागणी प्रामुख्याने अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी केली आहे.

## ऐरोली नाट्यगृहाच्या बांधकामाची अभिनेते प्रशांत दामलेंनी केली पाहणी



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर ५ ऐरोली येथे नवीन नाट्यगृहाचे बांधकाम सुरू असून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध अभिनेते श्री प्रशांत दामले यांनी या नाट्यगृहाच्या कामाची पाहणी करत समाधान व्यक्त केले.

महानगरपालिकेच्या विष्णुदास भावे नाट्यगृहातील व्यवस्था आणि यंत्रणेचे प्रशांत दामले नेहमीच विविध ठिकाणी भरभरून कौतुक करीत असतात. तशाच प्रकारे ऐरोली नाट्यगृह देखील आवश्यक सुविधांनी सुसज्ज असावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली व

तेथे आवश्यक सुविधांविषयी काही सूचना केल्या. नाट्यगृहामध्ये ध्वनी संयोजन व ध्वनी संतुलनासाठी ऍकॉस्टिक व्यवस्था, प्रकाश योजना, कलावंत रंगभूषा कक्ष, बैठक व्यवस्था, प्रसाधनगृह व्यवस्था या महत्त्वाच्या सुविधा असून त्यांची गुणवत्ता चांगली राखावी अशी सूचना त्यांनी केली.

## करंजा येथे सागरी मासेमारी जनगणना प्रशिक्षण शिबिराचे आयोजन




**उरण बातमीदार**

शनिवार ८ नोव्हेंबर २०२५ रोजी करंजा मच्छीमार सोसायटी करंजा ता.उरण, जिल्हा रायगड येथे सागरी मासेमारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन भारत सरकार मार्फत आयोजित करण्यात आले होते.

प्रशिक्षणार्थींना माहिती देताना विभागाचे अधिकारी दिनेश राव, प्रशिक्षणार्थी सेजल कोळी, रेश्मा कोळी व निशिकेत म्हात्रे, शिबिराला चेअरमन प्रदीप नाखवा, रायगड जिल्हा मच्छीमार सेलचे अध्यक्ष सिताराम नाखवा,माजी चेअरमन के.एल कोळी, सेक्रेटरी जयंत कडू,कुंडेगाव सोसायटीचे चेअरमन रत्नाकर कोळी व इतर समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी विविध विषयावर विभागाचे अधिकारी दिनेश राव,यांनी ही मार्गदर्शन केले

पान १ वरुन

## भाजप जनसंपर्क कार्यालयातून नागरिकांचे प्रश्न सुटतील

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयश्री पाटील यांनी केले. तळोजा फेज २ मधील मंगला रेसिडेन्सी येथे झालेल्या या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

या वेळी तळोजा फेज २मधील नवनियुक्त सेक्टर अध्यक्ष तसेच प्रभाग १ कमिटीतील नव्या पदाधिकाऱ्यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. त्यानुसार प्रभाग १ कमिटीच्या अध्यक्ष दीपक पाटील, सरचिटणीस जितेंद्र पोरजी, बाळाराम पाटील, उपाध्यक्ष अरुण पाटील, संतोष महद्री, भास्कर तरे, चिटणीस सचिन कोपरकर, संजय म्हात्रे, निहाल ठाकूर, समीर पाटील व कोषाध्यक्षपदी सतीश कदम यांची, तर तळोजा फेज २मधील सेक्टर २३चे अध्यक्ष जयसिंग गुंजाळ, से. ३७ अध्यक्ष अनिकेत पाटील, से. २७ अध्यक्ष सुमित गवांदे, से. २० अध्यक्ष प्रशांत काळे, से. २९ अध्यक्ष नवनाथ भोजने, से. २४ अध्यक्ष रतीश शेठी, से. २६ अध्यक्ष अजय भाऊगुडे, से. ८च्या अध्यक्ष डॉ. सतीश भोईर आणि से. २३चे अध्यक्ष हरप्रीत सिंग चड्डा यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. दरम्यान, तळोजातील सामाजिक कार्यकत्या माही मानकामे यांनी या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. त्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

## बोर्ली येथे उद्या नरेंद्राचार्य यांच्या पादुकांचा दर्शन सोहळा

**मुरुड** : रामानंदाचार्य नरेंद्राचार्य व पिठाचे उत्तराधिकारी कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशिर्वादाने मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता दक्षिणपीठ नाणीजधामच्या वतीने मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील अमित वेसावकर यांच्या मैदानावर सिद्ध पादुका दर्शन सोहळा होत असून सोहळ्याची जय्यत तयारी सुरु आहे.

या सोहळ्यामध्ये गुरुपूजनासह सामाजिक उपक्रमांतर्गत गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप रामानंद संप्रदायातर्फे करण्यात येणार आहे. या दिवशी सर्वप्रथम बोर्लीतील यजमान जितेंद्र पाटील यांच्या निवासस्थानापासून श्रींच्या पादुका वाजत गाजत कार्यक्रम स्थळी आणण्यात येतील कार्यक्रमस्थळी सर्वप्रथम श्रींच्या पादुकांचे आगमन झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सामाजिक दुर्बल घटक उपक्रमांतर्गत गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटपकरण्यात येणार आहे. त्यानंतर पादुकापूजन सोहळा होइल, अशी माहिती देण्यात आली.

## दुखवटा

### बाळाराम कडू

**उरण** : तालुक्यातील सोनारी गावचे बाळारामशेठ काळा कडू यांचे बुधवार ( दि. ५ ) नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८८ वर्षे होते.त्यांच्या पश्चाच तीन मुलगे, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. बाळारामशेठ कडू यांचे दशक्रिया विधी शुक्रवार (दि. १४) रोजी श्रीक्षेत्र नासिक यथे होणार असून उत्तरकार्य रविवार ( दि. १६) रोजी राहात्या घरी सोनारी येथे होणार आहे.



# सेवानिवृत्त दाम्पत्याला घातला लाखोंचा गंडा

## खारघरमध्ये सायबर चोरट्यांचा डिजिटल अ‍ॅरेस्टचा भयानक फास

**पनवेल : वार्ताहर**

सायबर गुन्हेगारांनी डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात अडकवून खारघर येथे राहणाऱ्या एका सेवानिवृत्त दाम्पत्याची तब्बल ४४ लाख ९१ हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या सायबर टोळीने चक्क आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांचे नाव आणि ईडीसारख्या सरकारी यंत्रणांचा वापर करून वृद्ध जोडप्याला भीती दाखवून त्यांना ऑनलाईन पद्धतीने ही रक्कम पाठवण्यास भाग पाडल्याचे उघडकीस आले आहे.

खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर टोळीविरोधात गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. फसवणूक झालेले ७८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक खारघरमध्ये राहतात. गेल्या १५ ऑक्टोबर रोजी सायबर टोळीतील एकाने त्यांना संपर्क करून तो डेटा प्रोटेक्शन बोर्डातून शर्मा बोलत असल्याचे सांगितले. तसेच नाशिकमधील काही लोकांकडून पैसे उकळल्याच्या तक्रारी त्यांच्याविरोधात मिळाल्याचे त्यांना सांगितले. याप्रकरणी नाशिक शहरातील रॉडरीक्स नावाच्या एका व्यक्तीने त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केल्याचे सांगितले. तर या सायबर टोळीतील दुसऱ्या आरोपीने पोलीस अधिकारी हेमराज कोहली असल्याचे भासवून या ज्येष्ठ नागरिकाला तपासामध्ये सहकार्य करण्यास सांगितले.

सहकार्य न केल्यास एका तासाच्या आत त्यांना अटक करण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांनी या वयोवृद्ध दाम्पत्याला मोठ्या शिक्षेची भीती दाखवून विश्वासात घेतले. तसेच त्यांनी सहकार्य केले नाही, तर त्यांना ७ वर्षांची शिक्षा किंवा जन्मभर तुरुंगवास होईल, अन्यथा पाच कोटींचा दंड भरावा लागेल, अशी भीती दाखवली. त्यानुसार या ज्येष्ठ नागरिकाने व त्यांच्या पत्नीने सायबर गुन्हेगारांनी सांगितल्याप्रमाणे सारस्वत बँक आणि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक खात्यातून आरटीजीएसद्वारे एकूण ४४ लाख ९१ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने आरोपींच्या खात्यांवर पाठवले.

या प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्वरित खारघर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरोधात गुन्हा नोंद करून तपासाला सुरुवात केल्याचे सांगितले.



**पनवेल : साप्ताहिक रोहा टाईम्सचे संपादक मनोज घोसाळकर यांनी रविवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन संवाद साधला. या भेटीत त्यांनी रोहा टाईम्सतर्फे प्रकाशित करण्यात आलेला स्त्री शक्ती दिवाळी विशेषांक लोकनेते रामशेठ ठाकूर यांना सुपूर्द करण्यात आला. रोहा टाईम्सकडून दरवर्षी महिलांच्या विविध क्षेत्रातील कामगिरीवर प्रकाश टाकणारा हा विशेषांक प्रसिद्ध केला जातो. यंदाच्या अंकातील लेखन आणि उपक्रमांची माहितीही घोसाळकर यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दिली. या वेळी पत्रकार शैलेश गावंड आणि सामाजिक कार्यकर्ते विशाल साळवी उपस्थित होते.**





**पनवेल : भाजपचे आगामी कार्यक्रम आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक या पार्श्वभूमीवर पक्षाचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल तालुका पूर्व मंडळची बैठक झाली. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, माजी जि.प. सदस्य एकनाथ देशेकर, जिल्हा ओबीसी मोर्चा सरचिटणीस यतिन पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, महेश पाटील आदी प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, सदस्य उपस्थित होते.**

# खारघरच्या इस्कॉन मंदिराला यांत्रिक हत्ती भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पद्मश्री पुरस्कार विजेत्या व खासदार हेमामालिनी आणि इंडियाने इस्कॉन खारघर या आशियातील दुसऱ्या क्रमांकाच्या मोठ्या मंदिराला जीवन-आकाराचा यांत्रिक हत्ती भेट दिला. महाराष्ट्रातील एखाद्या धार्मिक संस्थेत यांत्रिक हत्तीचा वापर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. रविवारी खासदार हेमामालिनी व इस्कॉन खारघरचे अध्यक्ष सूरदासजी यांच्या हस्ते गजेंद्रचे लोकार्पण करण्यात आले. या वेळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.



इस्कॉन खारघरचे अध्यक्ष सूरदासजी म्हणाले, भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण सर्व जीवांमध्ये समभाव ठेवण्याची शिकवण देतात. अहिंसेच्या मार्गाने परंपरा जपण्यासाठी यांत्रिक हत्ती मोठी पायरी आहे. खासदार हेमामालिनी यांनी या वेळी सांगितले, मी भगवान कृष्णांची भक्त असल्याने आणि प्राणिप्रेमी असल्याने या उपक्रमाचा भाग होणे माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. परंपरा जपत वास्तव हत्तींच्या संरक्षणाचा मार्ग इस्कॉनने दाखवला आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, आशियातील दुसऱ्या क्रमांकाच्या या इस्कॉन मंदिराने परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा सुंदर संगम साधत संपूर्ण देशासमोर नवा आदर्श ठेवला आहे. यांत्रिक हत्ती स्वीकारून मंदिराने करुणा, अहिंसा आणि आधुनिकतेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. हा उपक्रम महाराष्ट्राच्या प्रगतीशील विचारांचा उत्तम प्रतिबिंब आहे.

आमदार प्रशांत ठाकूर ते पुढे म्हणाले की, आधुनिक तंत्रज्ञान आणि संस्कृतीचा संगम साधणारे आयएसकॉन खारघरने जगासमोर करुणेचा आणि अहिंसेचा आदर्श ठेवला आहे. हा महाराष्ट्राच्या प्रगतिशील विचारांचा उत्तम नमुना आहे. यांत्रिक हत्तीचा वापर मंदिरातील पूजाविधी, शोभायात्रा आणि उत्सवांमध्ये केला जाईल. तो मीटर उंच, किलो वजनाचा असून पाच मोटरवर चालतो. त्याचे कान, सोंड, डोळे, शेपटी हलू शकतात तसेच तो पाणी उडवूही शकतो. इंडियाने पेक्षा अधिक मंदिरांना यांत्रिक हत्ती उपलब्ध करून दिले असून आयएसकॉन खारघरने जिवंत हत्ती कधीही न ठेवण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांना ही भेट देण्यात आली.





**पनवेल : शहरातील बालाजी मंदिरात गोरक्षनाथ प्रकट दिन साजरा झाला. या वेळी गुरूवर्य चौरगीनाथबाबा यांच्यासह माजी नगरसेविका दर्शना भोईर, कविता पाटील, आशा तलोजकर, सुचिता पोवळे, निलेश पोवळे आदी उपस्थित होते. सर्वांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.**

# कामोठ्यात रंगणार आगरी-कराडी महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, झेंडा सामाजिक संस्था, कामोठे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव २०२५ शुक्रवार, १४ ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही विविध कला, संस्कृती, मनोरंजन व समाजजागृती उपक्रमांचा समावेश असलेला हा महोत्सव नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

महोत्सवाचे उद्घाटक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असून प्रमुख पाहुणे आमदार प्रशांत ठाकूर व प्रमुख उपस्थिती माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची लाभणार आहे. कार्यक्रमाचे आयोजक अशोक राघो पावणेकर तर निमंत्रक जय रामदास पावणेकर आहेत.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विक्रांत पाटील, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह माजी नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी यांची उपस्थित असणार आहे.

महोत्सवात दररोज संध्याकाळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यात सोलो डान्स स्पर्धा, मिस अँड मिस्टर कामोठे, ब्रासबँड उत्सव, लावणी, महाराष्ट्राची लोकधारा यांचा समावेश आहे. तसेच भजन, कीर्तन व सांस्कृतिक सादरीकरणेही प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.

# सुरेश खरात यांची भाजप कामोठे शहर मंडळ चिटणीसपदी नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील सुरेश खरात यांची भाजप कामोठे शहर मंडळ चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसे पत्र त्यांना भाजप कामोठे शहर मंडळ अध्यक्ष विकास घरत यांनी दिले आहे. या वेळी जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, कामोठेचे माजी अध्यक्ष रवींद्र जोशी उपस्थित होते.



सुरेश खरात यांची भाजप कामोठे शहर मंडळ चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली असून आगामी काळात सर्वांना सोबत घेऊन पक्ष संघटन अधिक मजबूत करून निवडणुकांमध्ये पक्षाला मोठे यश मिळवून द्याल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या वेळी पंतप्रधान, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, मुख्यमंत्री, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे ध्येय धोरणे या कार्यक्रमांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याची जबाबदारी देण्यात आली.

सुरेश खरात हे कामोठे विभागात सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्याच्या या कार्याची दाखल घेऊन त्यांची कामोठे शहर मंडळ चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये इंडिया फाउंडेशनचा बौद्धिक परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयडिया ऑफ इंडिया फाउंडेशनतर्फे सीरत कॉन्क्लेव्ह २०२५ या बहुआयामी वैचारिक, बौद्धिक आणि सांस्कृतिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद अंजुमन-ए-इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस, न्यू पनवेल, नवी मुंबई येथे होणार आहे.

या कॉन्क्लेव्हचे उद्दिष्ट हजरत मोहम्मद यांच्या जीवन आणि नैतिक शिक्षणांचे आजच्या सामाजिक व नैतिक संदर्भात सादरीकरण करणे आहे. परिषदेचा मुख्य संदेश आहे -सीरत-ए-नबी ही मानवतेसाठी शांतता, न्याय, करुणा आणि राष्ट्रीय ऐक्याचे जिवंत उदाहरण आहे.

हे आयोजन अंजुमन-ए-इस्लाम ग्रुप ऑफ इन्स्टिटट्यूशन्स, इस्लाम जिमखाना, इक़रा इंटरनॅशनल एज्युकेशनल फाउंडेशन, इक़रा इंटिग्रल वीमन्स अलायन्स, वर्ल्ड हब सिटी, ग्लोबल पॅक्ट ग्रुप आणि रोजी हब यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे.

उद्घाटन सत्रात प्रमुख मान्यवर सहभागी होणार आहेत. लेफ्टनंट जनरल झमीरुद्दीन शाह, पद्मश्री डॉ. ज़हीर आय. काझी, तुषार गांधी, मौलाना बिलाल हसन नदवी आणि सलमान खुर्शीद त्यांच्या भाषणांतून सीरत-ए-रसूलमधील सार्वत्रिक मानवी मूल्यांवर प्रकाश टाकला जाईल.

मुख्य वक्त्यांमध्ये डॉ. पी. एस. पसरीचा, प्रा. फैझान मुस्तफा, डॉ. राम पुनियानी, सैयद सआदतुल्लाह हुसैनी, डॉ. उज़मा नाहिद, मोहम्मद अदीब, मोहम्मद अझहरुद्दीन, प्रा. अख्तरुल वासे आणि युसुफ इब्राहनी यांचा समावेश आहे.

सीरत पासून अंतरधार्मिक सौहार्दापर्यंत – एक जागतिक संवाद या विषयावर विशेष सत्रात डॉ. जे. रविकुमार स्टीफन, डॉ. केशवानंद दास, डॉ. कल्बे रश्द रिजवी आणि स्वामी देवेंद्र ब्रह्मचारी सहभागी होणार आहेत.

कार्यक्रमासोबत सीरत-ए-मोहम्मदचे तेजस्वी क्षण या नावाने कला आणि सुलेखन प्रदर्शनही आयोजित केले जाईल. तसेच आयडिया ऑफ इंडिया फाउंडेशनकडून सीरत अवॉर्ड्स २०२५ जाहीर केले जातील, ज्यात शिक्षण, सेवा, शौर्य, सामाजिक कार्य आणि पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यकर्त्यांचा गौरव केला जाणार आहे.

संस्थापक अध्यक्ष उमर सिद्दीकी म्हणाले की, सीरत कॉन्क्लेव्ह २०२५ हा केवळ एक कार्यक्रम नाही, तर एक वैचारिक चळवळ आहे जी विविध धर्म आणि विचारधारा एकत्र आणते आणि मानवतेसाठी मार्गदर्शनाचा तेजस्वी दीपस्तंभ ठरते.

अधिक माहितीसाठी events.ioi2025@gmail.com; www.ideaofindia.co.in; ९३२२०८७४७९/ ९३१५७५८३३८/ ८२६८८६१८८ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मोहोचापाडा परिसरात विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रयत्नातून मोहोचापाडा परिसरात विविध विकासकामे होत आहेत. या कामांचे भूमिपूजन व उद्घाटन रविवारी (दि.९) करण्यात आले.

यात मोहोचा पाडा अंतर्गत काँक्रीटीकरण झालेल्या रस्त्याचे उद्घाटन (खर्च १० लाख), मोहोचापाडा अंतर्गत गटार बांधकाम (खर्च १० लाख), मोहोचापाडा येथील अंगणवाडी ते गणपती घाटपर्यंत काँक्रीटीकरण झालेल्या रस्त्याचे उद्घाटन (खर्च २० लाख), मोहोचापाडा येथील बौद्धवाडीकडे जाणाऱ्या काँक्रीटीकरण झालेल्या रस्त्याचे उद्घाटन (खर्च २० लाख), बौद्ध वाडीतील बुद्ध विहार भूमिपूजन (१२ लाख निधी मंजुर), मोहोचापाडा अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन (खर्च १० लाख) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत व राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झालेल्या या भूमिपूजन व उद्घाटन झाले.



सोहळ्याला भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, जिल्हा ओबीसी मोर्चा सरचिटणीस यतिन पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, दशरथ पाटील, सतिश मालुसरे, अनंता पाटील, अरुण जळे, प्रवीण म्हात्रे (मोहो), चिंतामणी शेळके, माजी सरपंच शैलजा भोईर, रघुनाथ भोईर, सुशांत सोनावणे, दीपक सोनावणे, गुरुनाथ भोईर, विष्णू भोईर, अनिल सोनावणे, जगदीश सोनावणे, गणेश भोईर, पांडुरंग भोईर, शंकर भोईर, रघुनाथ शं. भोईर, संजय नागा भोईर, प्रवीण पालव, संतोष पाटील, महेंद्र अण्णा भोईर, माया गोमा भोईर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या विकासकामांमुळे परिसरातील रस्ते, जलनिस्सारण व्यवस्था व नागरी सुविधा अधिक सुधारतील. नागरिकांना या उपक्रमांमुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

# मृतावस्थेत बाळ सापडले

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर १ परिसरात दोन दिवसांचे अर्भक मृतावस्थेत सापडल्याने या परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिक रहिवाशांना रस्त्यालगत एक अर्भक आढळून येताच त्यांनी तत्काळ कळंबोली पोलिसांना ही माहिती दिली. त्यावर पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत अर्भकाला उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले.

प्राथमिक अंदाजानुसार, अर्भकाला जाणीवपूर्वक टाकून दिल्याची शक्यता वर्तवली जात आहे. लोकवस्तीत अर्भक आढळल्यानंतर परिसरात उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. या प्रकरणाचा तपास कळंबोली पोलीस ठाण्याचे पो. नि. अभयसिंग यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कळंबोली पोलीस सीसीटीव्ही फूटेज, स्थानिक माहितीदार यांच्यामार्फत करीत असल्याचे सांगण्यात आले आहे.


## संपादकीय

# बिबट्याची दहशत

महाराष्ट्रात अलीकडे बिबट्याचा मानवी वस्तीमध्ये वावर वाढला आहे. विशेषतः पुण्याच्या ग्रामीण भागात बिबट्याच्या वाढत्या हल्ल्यांमुळे ग्रामस्थांमध्ये प्रचंड दहशत पसरली आहे. निसर्गसंपन्न नाशिकमध्येही बिबट्याच्या हल्ल्याची घटना नुकतीच घडली असून त्यात तरुणाचा मृत्यू झाला. हल्ली अनेक ठिकाणी बिबट्याचा मुक्तसंचार दिसून येतो. रायगड जिल्ह्यातदेखील या प्राण्याचा वावर चिंतेत भर टाकणारा आहे.

**बिबट्यांचा स्वभाव अत्यंत चपळ आणि गुप्त असतो. ते साधारणतः माणसांच्या नजरेपासून दूर राहणे पसंत करतात, पण गेल्या दशकभरात ते गावांच्या आणि शहरी सीमेपर्यंत पोहचले आहेत. त्यामुळे विशेषकरून शेतीत रात्री काम करणारे शेतकरी, बाहेर जाणारी मुले, आणि महिला यांना आता स्वतःचे रक्षण करणे हीच प्राथमिकता बनली आहे. जंगलतोड आणि अतिक्रमणामुळे वनक्षेत्र घटत चालले आहे. औद्योगिक विकास, रस्ते, धरणे आणि शहरीकरण यामुळे प्राण्यांचे नैसर्गिक निवासस्थान नष्ट होत आहे. त्याचप्रमाणे बिबट्यांच्या शिकारीसाठी आवश्यक प्राणी जसे की ससे, हरणे, माकडे यांची संख्या घटल्याने बिबटे गावात जनावरांवर किंवा कधी कधी माणसांवर हल्ले करीत आहेत. हा बिबट्यांचा स्वभावदोष नसून जगण्यासाठीचा संघर्ष आहे हे मानले तरी त्यात मानवी जीव जाणे चिंताजनकच आहे. अलीकडच्या काळात काही गंभीर घटना समोर आल्या आहेत. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गावात १३ वर्षीय मुलाचा बिबट्याने घेतलेला बळी, नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर परिसरात तरुणाचा हल्ल्यात मृत्यू, अहिल्यानगर आणि ठाणे जिल्ह्यातील गावांमध्ये शेळ्यांवर व वासरांवर झालेली बिबट्याची शिकार अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. केवळ घाटमाथ्यावरच नव्हे; तर इतरही जिल्ह्यांमध्ये बिबट्यांचे दर्शन घडत आहे. मध्यंतरी रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील कशेणे येथे एक बिबट्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. आता रोहा तालुक्यातील बाहे गावाजवळ बिबट्या दिसून आला. त्यानंतर वनविभागाने पाहणी करून आढावा घेत गस्तीचे नियोजन केले आहेत तसेच नागरिकांनी सतर्क राहून अफवा न पसरवण्याचे आवाहन केले आहे. राज्यातील बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांची सरकारी पातळीवर दखल घेण्यात आली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महत्त्वाच्या प्रश्नावर केंद्र सरकारची मदत घेणार असल्याचे म्हटले आहे. राज्य सरकार बिबट्यांना पकडून बचाव केंद्रांमध्येही पाठवण्यासाठी, त्यांची मोठ्या प्रमाणावर नसबंदीकरण करण्यासाठी आणि हल्लेखोर बिबट्यांना मारण्याची परवानगी केंद्राकडे मागणार आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदलमंत्री भूपेंद्र यादव यांच्याशी बिबट्यांच्या हल्ल्यांबद्दल प्राथमिक चर्चा केली असून आम्ही केंद्र सरकारला एक सविस्तर प्रस्ताव पाठवू आणि लवकरच परवानगी मिळेल अशी आशा आहे, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. या प्रश्नावर स्थानिक नागरिकांचाही सहभाग तितकाच आवश्यक आहे. रात्री गावाबाहेर एकट्याने जाणे टाळणे, कचरा आणि जनावरांच्या अवशेषांची योग्य विल्हेवाट लावणे, शाळकरी मुलांना सुरक्षित मार्गाने पाठविणे, गावात सोलर लाईट बसवणे यांसारखे साधे उपायही मोठा फरक घडवू शकतात, तर वनविभागाने गावोगावी जागरूकता मोहीम राबवणे, सीसीटीव्ही आणि ट्रॅप कॅमेरे बसविणे तसेच रेस्क्यू टीम तैनात ठेवणे गरजेचे आहे.**

# नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची रंगत



नुकत्याच नगर परिषदेच्या निवडणुका जाहीर झाल्या. राज्यात मुख्य लढत महायुती आणि महा विकास आघाडी मध्ये होणार असली तरी कोण कुठल्या पक्षाचा उमेदवार असेल हे सांगता येत नाही. अगदी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम क्षणी देखील काहीही होऊ शकते. तुम्ही काही म्हणा परंतु या निवडणुकीत आयाराम गायारामांची चांगलीच चलती आहे. त्यामुळे राज्यातील या राजकारणा मुळे जिल्ह्यातील नव्हे तर तालुक्यातील, शहरातील, गावातील, अगदी गल्लीतील राजकारण देखील बदलले आहे. आपला उमेदवार निवडून येणार नाही म्हणून पक्ष सोडून अन्य उमेदवाराकडे आलेले पदाधिकारी व कार्यकर्ते अवघ्या चोवीस तासात माघारी फिरल्याची ताजी उदाहरणे आहेत. थोडक्यात दिल्ली ते गल्ली तील राजकारण बदलल्याने प्रामाणिक कार्यकर्त्यांची कुचंबणा होऊ लागली आहे परिणामी कार्यकर्त्यांना ऐन निवडणुकीत कोणता झेंडा घेऊ हाती ? असा संभ्रम निर्माण झाला आहे.

पूर्वीचे कार्यकर्ते एकनिष्ठ असायचे त्यावेळी पैसे घेऊन मतदान करण्याची पद्धत नव्हती. पक्षाने एखादा उमेदवार जाहीर केला की, तन मनाने तो कसा निवडून येईल यासाठी त्याचे कार्यकर्ते जीवाचे रान करीत असत. अगदी चाळीस वर्षांपूर्वी सुद्धा केवळ वडा पाव खाऊन कार्यकर्त्यांनी आपले उमेदवार निवडून आणले आहेत. त्याकाळी बैलगाडीने प्रवास करावा लागत असे आणि ज्या गावात मुक्काम असे त्या गावात एखादा जवळचा नातेवाईक म्हणजे बहिणीचा नवरा असला आणि तो जर विरोधी पक्षाचा असला की, त्याच्या घरी जाणे सोडा तर त्याच्याकडे ढुंकून न बघणारे कार्यकर्ते होते. भावां बरोबरचे नाते तोडण्यातही ते मागे पुढे पाहत नव्हते. इतकी पक्षनिष्ठा त्यांच्या अंगी ठासून भरली होती.

त्यावेळी पक्षाला मानणारे निष्ठावंत कार्यकर्ते असल्याने असे त्यांना वागावे लागत असे. आता निष्ठा सोडा कोणता कार्यकर्ता आज कोणत्या पक्षात आहे? याचा अंदाज बांधत असताना तो कुठल्या तरी पक्षात गेलेला असतो. असे राजकारण सर्वच ठिकाणी सुरू आहे.

सुरुवातीला पायपीट करून निवडणुकीचा प्रचार होत असे. त्यानंतर बैलगाडी किंवा सायकलवरून प्रचार होत असे. कालांतराने जीप गाड्या प्रचारासाठी वापरण्यात येऊ लागल्या. त्यावेळचे रस्ते मातीचे असत. त्यामुळे प्रचारासाठी जाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कपड्याची खूप खराबी होत असे. हल्ली कडक इस्त्रीचे कपडे वापरणारे कार्यकर्ते आहेत. ते कामापेक्षा आपल्या कपड्यांची इस्त्री मोडणार नाही? याकडे जास्त लक्ष देणारे आहेत. पक्षासाठी नाती गोती विसरणाच्या कार्यकर्त्यांची संख्या खूप होती. तर काही कार्यकर्ते निवडणुकीपूरती नाती गोती दूर ठेवत असत. आता भावाच्या विरुद्ध सख्खा भाऊ निवडणूक लढविण्यास तयार असतो. याचे एकमेव कारण म्हणजे माझ्यापेक्षा कुणी मोठा नाही. ही ईर्षा मनामध्ये असते. त्यामुळे 'भाऊबंदकी' तुटलेली अनेक उदाहरणे आहेत. हल्ली एकच घरातील अनेक पक्षात भाऊ - भाऊ आहेत म्हणजे सोयीचे राजकारण सुरू आहे.

पूर्वी एखाद्या मोठ्या निवडणुकीची प्रचारसभा शहराच्या ठिकाणी किंवा तालुक्याच्या ठिकाणी असली की कार्यकर्ते स्वखर्चाने बैलगाडीने किंवा मैल न मैल चालत येत असत.

**खबरबात**
**विजय मांडे**

मध्यंतरी त्यामध्ये बदल झाला आणि ट्रकने माणसे सभांसाठी आणण्यात येत होती. आता तर रोजंदारीने माणसे आणली जातात आणि ती सुद्धा लक्सरी बस किंवा कारने आणावी लागतात. दिवसेंदिवस त्यामध्येही बदल होऊन वातानुकूलित बस किंवा वातानुकूलित कारची अपेक्षा कार्यकर्त्यांना असते. हे बदल या गेल्या पाच - दहा वर्षात झाले आहेत. आघाड्यांची बिघाडी कधी होईल ते सांगता येत नाही. या निवडणुकीत एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेला उमेदवार पुढच्या निवडणुकीत त्याच पक्षात असेल याची शास्वती देता येत नाही तर कार्यकर्त्यांची भूमिका कुणी सांगावी कशी असेल ते? टी. एन. शेषन यांनी आचारसंहितेचे अंमलबजावणी सुरू केली आणि थोड्या दिवसांपुरता राजकारणी घाबरले होते. मात्र त्यावरही उपाय योजना शोधून निवडणूक जिंकण्यासाठी काहीही करण्यास उमेदवार मागे पुढे पहात नाहीत. हल्ली निवडणूक म्हटले की कार्यकर्त्यांची व मतदारांची चंगळ असते. निवडणुका जाहीर होण्याच्या आधीपासूनच मटणाच्या पार्ट्या सुरू असतात. निवडणुकीच्या आदल्या रात्री दरवाजा उघडा ठेऊन टी व्ही चा आवाज मोठा ठेऊन रात्र रात्र जागणारे मतदार अनेक ठिकाणी बघायला मिळतात. याचा 'अर्थ' असा की आम्ही जागे आहोत. हल्ली कोटी रुपये म्हणजे काहीच नाही असे झाले आहे. त्याला खोक्याची उपमा दिली आहे. निवडणुक काळात पोलिसांच्या सतर्कतेने वाहनांची तपासणी करताना दहा - पंधरा कोटी रुपये सहज पकडले जातात. अशी किती वाहने पोलिसांची नजर चुकवून गेली असतील. हे सांगता येत नाही. म्हणजे या निवडणुकीत पैशांचा पाऊस पडणार आहे. हे नक्की.

एकाच कुटुंबातील चार सख्खे भाऊ निरनिराळ्या पक्षात आहेत. इतकेच नाही तर बाप एका पक्षात तर मुलगा दुसऱ्या पक्षात असेही निवडणुकीच्या तोंडावर घडत आहे. याची अनेक उदाहरणे या निवडणुकीत दिसून येत आहेत. मोठा भाऊ भारतीय जनता पक्षाच्या मोठ्या पदावर, दोन नंबरचा भाऊ शिंदे गटाच्या मोठ्या पदावर, तीन नंबरचा भाऊ अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये तर एकदम लहान भाऊ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या महत्वाच्या पदावर. त्यामुळे कोणताही पक्ष सत्तेत आला की, आपल्याला फरक पडत नाही. सगळेच आपले अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे.

यामुळे कार्यकर्त्यांचे मरण झाले आहे. गेल्या दोन पाच वर्षात पक्षनिष्ठाच राहिली नाही. युतीत निवडणूक लढवून सत्ता मात्र शत्रू पक्षाच्या आघाडी बरोबर जाऊन मिळवायची किंवा गट तयार करून कुणाही बरोबर सत्तेत बसायचे या प्रकारामुळे कार्यकर्त्यांचे मरण झाले आहे, कारण पक्षाचा उमेदवार निवडून येण्यासाठी एकमेकांची डोकी फोडली. त्यावेळी सख्या भावालाही सोडला नाही. आणि अशा अभद्र युती आघाडीमुळे निवडून आलेला व पराभूत झालेला उमेदवार स्वार्थासाठी एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसतो. त्यामुळे कार्यकर्त्यांना कोणता झेंडा घेऊ हाती?..... असा प्रश्न पडला तर आश्चर्य वाटू नये.

कर्जत तालुक्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर महायुती राहिलीच नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिंदे शिवसेना यांच्यामध्ये कमालीचा वाद झाला आहे. त्याची प्रचीती विधानसभा निवडणुकीत आली. आता नगरपरिषद निवडणुकीत तर कहरच झाला आहे. महायुतीतील भारतीय जनता पक्ष आणि शिंदे सेना एकत्रित निवडणूक लढविणार असल्याचे आता तरी दिसत आहे.

मात्र प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज भरताना काय होईल हे त्या दिवशीच कळेल. महायुती पक्ष चिन्हावर निवडणूक लढवील. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट एकत्र आला असून त्यांनी कर्जत परिवर्तन आघाडी स्थापन करून निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी केली आहे. या आघाडीत मनसे, शेकाप, राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस सुद्धा सामील होण्याची शक्यता आहे. या आघाडीची निशाणी रिक्षा किंवा कपबशी असेल. असे असले तरी उद्या पासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे तरी सुद्धा दोन्ही कडून अद्याप थेट नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर करण्यात आला नाही. थेट नगराध्यक्षपद इतर मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षित आहे. दोन्ही बाजूकडून यासाठी चाचपणी सुरु आहे. दोन्हीकडे पक्ष प्रवेश सोहळ्यांचा धडाका सुरु आहे.

माथेरान नगरपरिषदेच्या बाबतीत कुणीच ठामपणे सांगू शकत नाही. तेथे अगदी पहिल्यापासून कुणीही कुणाशीही युती किंवा आघाडी करीत आले आहे. तेथे नगराध्यक्षपद सर्वधारण असल्याने तेथील थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार जवळ जवळ निश्चित झाले आहेत.

## बदलते तंत्रज्ञान

### ऑनलाईन शॉपिंग करताना 'ही' काळजी आवर्जून घ्या!

दिवाळी आली की बहुतेक सगळ्या ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्मवर भरपूर डिस्काऊंट्स चालू असतात. अशा सिझनल डिस्काउंटच्या काळात शॉपिंग करणं अनेकदा फायदेशीर असतं पण हे करत असताना आपली फसवणूक होणार नाही याची काळजीही घेतली पाहिजे. ऑनलाईन शॉपिंग हल्ली मुलंही मोठ्या प्रमाणावर करतात. आईबाबांची क्रेडिट कार्ड्स वापरुन मुलांच्या आणि टिनेजर्सच्या शॉपिंगचं प्रमाण वाढत असताना, मोठ्यांबरोबरच मुलांनीही ऑनलाईन फसवणुकीपासून वाचण्यासाठी काय करायचं हे समजून घेतलं पाहिजे.




फेक वेबसाईटमध्ये मूळ खऱ्या वेबसाईटच्या नावात, लोगोच्या डिझाईनमध्ये किंचित बदल केलेला असतो. त्यामुळे वेबसाईट उघडताना, उघडल्यावर आपण ओरिजिनल वेबसाईटवरच आहोत ना हे तपासा. वेबसाईटवरचे कीप मी लॉग्ड इन किंवा रिमेम्बर मी सारखे पर्याय कधीही निवडू नका.

शॉपिंग ॲप किंवा वेबसाईटवर जर एखादा फॉर्म असेल आणि ऑटो फीलअप करा असं म्हणत असेल तर कधीही ऑटो फीलअप करू नका. या फॉर्म्समध्ये काही वेळा तुमचे बँक, क्रेडिट/डेबिट कार्ड डिटेल, सीव्हीव्ही नंबर, खाते क्रमांक या गोष्टीही सेव्ह करण्याची सोय असते. त्यांचा गैरवापर होऊ शकतो.

दिशाभूल करणाऱ्या ऑफर्स उदाहरणार्थ अमेझॉनकडून आयफोन मोफत मिळवण्यासाठी या लिंकला क्लिक करा. अशा प्रकारचा मेसेज आला, तर अगदी मूलभूत प्रश्न स्वतःला विचारा, अमेझॉन कशाला कुणाला आयफोन फुकट देईल? तरीही मोह होतच असेल तर एकदा अमेझॉनच्या साईटवर जाऊन खरंच अशी कुठली ऑफर सुरु आहे का हे तपासा. मागचा पुढचा विचार न करता, काहीतरी फुकट मिळतंय म्हणून गुन्हेगारांच्या गळाला लागू नका.

OTP कधीही कुणाशीही शेअर करू नका. जर समोरची व्यक्ती क्रेडिट किंवा डेबिट कार्डचा जळ्झ मागत असेल तर तो तुम्हाला फसवतोय हे लक्षात घ्या आणि सुरू असलेलं संभाषण थांबवा. नंबर ब्लॉक करा. त्या नंबरवरुन आलेल्या लिंक्सवर क्लिक करू नका.

तुम्ही ऑनलाईन तक्रारही नोंदवू शकता. https://cybercrime.gov.in/ या सरकारी साईटवर तुम्ही झालेल्या फसवणुकीची तक्रार नोंदवू शकता.

# ज्येष्ठ गायिका माणिक वर्मा

माणिक वर्मा या मराठीतील नामवंत भावगीत गायिका होत्या. त्यांनी गायिलेल्या सुमारे ३०० ध्वनिमुद्रिका आजही लोकप्रिय आहेत. माणिक वर्मा, पूर्वाश्रमीच्या माणिक बळवंत दादरकर यांचा जन्म १६ मे १९२६ रोजी बळवंत दादरकर आणि हिराबाई दादरकर यांच्या पोटी झाला. हिराबाईंनी आपल्या मुलीची संगीताची गोडी लहानपणीच ओळखली आणि त्यांना एक कुशल गायिका होण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा चंग बांधला. मात्र, हा मार्ग सोपा नव्हता. कारण त्याकाळी पारंपरिक संगीतामध्ये महिलांचा सहभाग निषिद्ध मानला जात होता.

माणिक वर्मा यांनी आपले प्रारंभिक प्रशिक्षण भारतीय गायन समाजात ज्येष्ठ गायक अप्पासाहेब भोपे यांच्याकडून घेतले. त्यानंतर ख्यातनाम गायक सुरेशबाबू माने, उस्ताद अझमत हुसेन खान, उस्ताद इनायत खान, भोलानाथ भट्ट आणि पं. जगन्नाथ बुवा पुरोहित यांच्याकडूनही पुढचे प्रशिक्षण घेतले. प्रख्यात गायिका हिराबाई बडोदेकर (सुरेशबाबू माने यांची बहीण) यांचादेखील माणिक वर्मा यांच्या गायकीवर प्रभाव होता. किराणा आणि आग्रा घराणा या दोन्हींचे प्रशिक्षण असले, तरी माणिकबाईंनी स्वत:ची गायकी आत्मसात करण्यावर भर



**निमित्त**


दिला. हळूवार आवाजाची लय कायम ठेवत त्यांनी पुढे नाव कमावले.

वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांना सुरुवात केली. अवघ्या १५ वर्षांच्या असताना त्यांनी पहिल्या ध्वनिमुद्रिकेसाठी पार्श्वगायन केले, तर वयाच्या १७ व्या वर्षी सूरत येथे पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी आयोजित केलेल्या मैफलीत त्यांचे पहिले भव्य सादरीकरण झाले. मुंबई विद्यापीठातून कला शाखेत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पुण्याच्या गांधर्व महाविद्यालयातून संगीताचा अभ्यास केला. १९४७ मध्ये वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी कोलकात्याची तानसेन मैफल स्वतःच्या कलावंतांच्या जोरावर गाजवली. तिथून पुढे त्या हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील दिग्गज कलाकार म्हणून गणल्या जाऊ लागल्या. आकाशवाणीने त्यांची भजने आणि भक्तीगीते सुरू करून श्रोत्यांची सकाळ प्रसन्न केली. त्यामुळे माणिकबाई महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचल्या. एप्रिल १९५५ मध्ये त्यांची गाणी 'गीत रामायण' मालिकेचा भाग बनली. आकाशवाणी पुणे केंद्राने दर आठवड्याला वर्षभर हा कार्यक्रम आयोजित केला होता.

माणिक बळवंत दादरकर यांनी १९४७ मध्ये प्रख्यात लेखक आणि गीतकार अमर वर्मा यांच्याशी लग्न केले. या दाम्पत्याला चार मुली झाल्या. गायिका राणी वर्मा, अरुणा जयप्रकाश, प्रख्यात मराठी-हिंदी अभिनेत्री भारती आचरेकर आणि ख्यातनाम मराठी अभिनेत्री वंदना गुप्ते या चार मुलींनीही आपापल्या क्षेत्रात अमाप प्रसिद्धी मिळवली.

माणिक वर्मा यांना १९७४ मध्ये प्रतिष्ठित पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यानंतर १९८६ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला. पुढे महाराष्ट्र सरकारने लता मंगेशकर पुरस्काराने गौरविले. महाराष्ट्र गौरव आणि ग. दी. माडगुळकर पुरस्कारानेही त्यांना सन्मानित करण्यात आले वयाच्या ७० व्या वर्षी १० नोव्हेंबर १९९६ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : इटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### हास्य-विनोदाने शरीराला होतात अनेक फायदे

हास्य आणि विनोद आपल्याला नेहमी प्रसन्न करतात. मूल सहा आठवड्याचे झाले की, पहिल्यांदा आपल्याकडे बघून हसते आणि आपल्या चेहऱ्यावरही आपोआप हसू उमटते. सकाळी सकाळी फिरायला बाहेर पडल्यावर कोणी अनोळखी व्यक्ती जरी आपल्याकडे पाहून हसली आणि म्हणाली, 'सुप्रभात', तर आपले मन प्रसन्न होते. पावसात आपली छत्री उलटी झाली की कोणीतरी आपल्याकडे बघून हसते आणि आपणही सहजच हसू लागतो. आपण भिजून चिंब झालो आहोत, हे ही आपण विसरतो!



हसणे ही क्रिया आपल्याला इतरांशी जोडते. अनोळखी व्यक्तीशी ओळख करून घेणे, नवीन ठिकाणी योग्य ती माहिती मिळवणे, आपले काम करून घेण्यासाठी लोकांचे सहकार्य मिळवणे, दुसऱ्याला धक्का लागला, कोणाची वस्तू आपल्या हातून पडली किंवा अशी काही आपल्या हातून चूक झाली तर एक 'स्माईल' दिले की झाले! समाजात वावरताना हास्य अशा प्रकारे एकमेकांमधला दुवा बनते.

एकत्रितपणे काम करतानाही हास्याचा खूप उपयोग होतो. खूप ताण निर्माण करणारे काम करताना काहीतरी विनोद घडतो आणि वातावरण हलकेफुलके बनते. आपोआपच ताण कमी होतो. एकमेकांना काम पूर्ण करण्यासाठी मदत करावीशी वाटते, संवाद सुधारतो, राग लोभ विसरले जातात आणि संघर्ष टळतो. ऑफिसमध्ये पूर्ण करण्याची एखादी जबाबदारी, घरातल्या मोठ्या कार्यक्रमाची तयारी, सोसायटीमधला सार्वजनिक कार्यक्रम अशा सगळ्या ठिकाणी घडलेला एखादा विनोदी प्रसंग, कोणीतरी केलेली शाब्दिक कोटी पुढचे अनेक तास काम करण्याचे बळ देते.

हसण्याने शरीर शिथील होते, हृदयाचे कार्य सुधारते, वेदना कमी करण्यास मदत होते, शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. मेंदूमध्ये स्रवणाऱ्या विशिष्ट द्रव्यांमुळे हास्यविनोदाने मनात आनंद निर्माण होतो आणि अर्थातच हसण्याचा अनुभव पुन्हा पुन्हा यावा असे वाटते. मनावरचा ताण कमी करणे हे विनोदाचे मोठे कार्य आहे. स्किझोफ्रेनिया, उदासीनता, अतिचिंतेचा विकार अशा विविध मानसिक विकारांच्या उपचारांमध्ये विनोदाचा वापर करून उदासपणा आणि चिंता कमी करता येते. एकूणच हास्यविनोद करीत जगत राहिले तर मन व शरीर दोन्ही स्वस्थ राहते.

# रायगडात गुरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर! पेंढा भिजला, पशुधनावर उपासमारीची वेळ

**पाली : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने भातशेतीचे प्रचंड नुकसान झाल्याने बळीराजा पुरता हतबल झाला आहे. अनेकांचे उभे भातपीक शेतातच कुजले तर काहींचा भात पुन्हा उगवला. मात्र या सगळ्यांमध्ये भात झोडणी झाल्यावर निघणारा पेंढा उरलाच नसल्यामुळे गुरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे त्यामुळे बळीराजा आणि पशुपालक प्रचंड चिंतेत आहेत.

काहीजणांना उरला सुरलेला भात हाती आला मात्र, भिजलेला भात काळा पडला आहे. त्यामूळे त्यास बाजारात अत्यल्प किंमत मिळेल. तसेच भिजलेल्या पेंढ्यामुळे गुरांची वैरण गेली आहे. उभे भात पीक सडल्याने आता पेंढाच उरला नाही. शिवाय पेंढा भिजल्याने तो खाण्यायोग्य व साठवणीसाठी योग्य राहिला नाही. मग आता पशुधनाला खायला तरी



काय घालायचे? पावसाळ्यानंतर जनावरांसाठी पेंढा हे महत्वाचे खाद्य आहे. पण आता पेंढाच नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी चिंता निर्माण झाली आहे. आता पशुधनाला पेंढ्या ऐवजी सरकी किंवा शेंगदाणा पेंढ किंवा सोयाबीन ढेपआदी पर्यायी खाद्य द्यावे लागेल.

मात्र त्याच्या किमती प्रचंड आहेत, तसेच उपलब्ध असलेल्या पेंढ्याचे भाव देखील वाढले आहेत. परिणामी आधीच गांजलेल्या शेतकरी व पशु पालकांना अतिरिक्त खर्चाचा भार पडणार आहे. शिवाय दुध-दूभत्याचे नुकसान होणार आहे.

शेतकऱ्यांनी खाण्यासाठी ठेवलेला भात खराब झाल्याने त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तसेच हाती पैसा नसल्याने कुटुंबाचा खर्च कसा भागवावा ही देखिल भ्रांत शेतकऱ्यांना पडली आहे. आणि आता दूध दुभते पदार्थ विकून शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक हातभार लागतो तो देखील पेंढ्या अभावी कमी होणार आहे.

त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांना शेतीच्या नुकसान भरपाई बरोबरच जनावरांच्या खाद्याची व्यवस्था देखील करावी. तसेच गरज असेल तिथे चारा छावण्या उभाराव्या अशी मागणी सुधागड तालुका कृषी मित्र संघटनेचे अध्यक्ष शेतकरी शरद गोळे यांनी केली आहे.

## भाजप सहकार आघाडी प्रदेश सहसंयोजक प्रकाश दरेकर यांची रोहा कार्यालयाला भेट

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप सहकार आघाडी महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक व मुंबई प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश दरेकर यांनी नुकतीच रोहा येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयाला भेट दिली तसेच या प्रसंगी त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या हस्ते करण्यात आले.

भेटीदरम्यान दरेकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत कार्यकर्त्यांशी दिलखुलास संवाद साधला. आपल्या राजकीय प्रवासातील अनेक अनुभव त्यांनी शेअर केले. पक्ष संघटनेची उभारणी, कार्यकर्त्यांची भूमिका आणि आगामी काळातील पक्षाची दिशा यावर त्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.भाजप कार्यकर्ता हा पक्षाची खरी ताकद आहे. प्रामाणिकपणे आणि समर्पणाने काम केल्यास जनतेच्या मनात आपले स्थान कायम राहते असे दरेकर यांनी सांगितले. त्यांच्या संवादाने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि प्रेरणा निर्माण झाली.

या वेळी तालुका अध्यक्ष अमित घाग, रोहा शहराध्यक्ष सुमित रिसबूड , वैभव कुलकर्णी , परेश चितळकर, , रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्ष नरेश कोकरे, रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, गुंड, ज्ञानेश्वर जाधव, माजी पदाधिकारी, युवा कार्यकर्ते आदी होते.



## तांबाटी येथे आयुर्वेदिक कर्करोग रुग्णालय

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील तांबाटी या गावात ३०० कोटींचा आयुर्वेदिक कर्करोग रुग्णालय प्रकल्प २०२६ पर्यंत पूर्ण होणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे, त्यामुळे या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

पारंपरिक आयुर्वेद आणि आधुनिक कर्करोग उपचार यांचं एकत्रित मॉडेल साकार करण्यासाठी भारतात पहिल्यांदाच आयुर्वेदिक कर्करुग्णालय आणि संशोधन केंद्र उभारण्याची तयारी सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील तांबाटी गावी उभारण्यात येणारा हा १०० बेडचा अत्याधुनिक प्रकल्प देशात आयुर्वेद-ऑन्कॉलजी समाकलनाच्या नव्या युगाची सुरुवात करणार आहे.

टाटा मेमोरियल सेंटर आणि केंद्रीय अणुऊर्जा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साकार होत असलेल्या खोपोली -पेण मार्गावरील तांबाटी या प्रकल्पासाठी तब्बल ३०० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रुग्णालयात आधुनिक औषधोपचारांसोबतच आयुर्वेद, पंचकर्म, योग आणि आहारोपचार यांचे समन्वयित उपचारपद्धतीत रूपांतर करण्यात येणार आहे, असे टाटा मेमोरियच्या सूत्रांनी सांगितले.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशात दरवर्षी सुमारे १४ लाख नवे कर्करुग्ण निदान केले जातात. त्यातील बहुतेकांना उपचारानंतर थकवा, भूक मंदावणे आणि मानसिक तणाव यांचा सामना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर समाकलित आरोग्यकेंद्राची गरज भासू लागली आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच बांधकाम २०२५ च्या अखेरपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा असून, २०२६ मध्ये रुग्णसेवा सुरू करण्याच लक्ष्य ठेवण्यात आलं आहे. त्याचबरोबर, या केंद्रात राष्ट्रीय आयुर्वेद संस्था आणि टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे संयुक्त संशोधन प्रकल्पही हाती घेतले जाणार आहेत.

तज्ज्ञांच्या मते, तांबाटी येथे उभं राहत असलेलं हे केंद्र देशभरात समग्र उपचाराची नवी दिशा दाखवेल. कर्करोगाविरोधी लढ्यात केवळ औषधोपचार नव्हे, तर जीवनशैली, मनःशांती आणि आहार यांचा समन्वय आवश्यक आहे. आयुर्वेद हेच त्या संतुलनाचं उत्तर ठरू शकत, अस आयुष मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी सांगतात.

हे परवडणारा, पूरक आणि समग्र पर्याय उपलब्ध होणार आहे. आयुर्वेदावर आधारित हा प्रयोग यशस्वी ठरल्यास, भारतातील इतर राज्यांमध्येही अशा केंद्रांची मालिका सुरू होण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी या केंद्रास जमीन उपलब्ध करून दिली आहे.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर धावत्या ट्रकला भीषण आग



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवर शनिवारी सायंकाळी एका धावत्या ट्रकला अचानक आग लागली मात्र या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसल्याने मोठी दुर्घटना टळली.. मुबंई पुणे एक्सप्रेसवेवरून ट्रक मुबंईहुन माल घेऊन पुण्याकडे जात असताना.तो बोरघाट पोलीस चौकी जवळ आला असता त्या ट्रकच्या टपावर ठेवलेल्या कागदांना अचानक आग लागली, चालकाच्या आग लागल्याची घटना लक्षात आल्याने त्याने तो ट्रक प्रसंगसावधान राखत रस्त्याच्या कडेला घेत थांबवला, या घटनेची माहिती मिळताच बोरघाट पोलीस आणि हेल्प फाउंडेशनचे सदस्य दाखल होत अग्निशमन दलाला बोलावून आग विझवल्याने मोठ्या अनर्थ टळला.

## विशाल शिंपीला पोलीस कोठडी

**मुरुड : प्रतिनिधी**

प्रसन्न पुलेकर याना लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार केल्याचे आढळून आल्याने व त्याची पोलीस तपासात समाधानकारक उत्तर विशाल शिंपी यांनी न दिल्यामुळे मुरुड पोलिसांनी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिंपी याना अटक करण्यात येऊन न्यायालयात हजर केले असता प्रथम त्यांना पाच दिवसाची व पुन्हा कोर्टात हजर केले असता त्यांना पाच दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

मुरुड शहर व ग्रामीण भागातील जनतेस कमीत कमी एक लाख रुपये गुंतवल्यास प्रत्येक महिन्यास दहा हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची गुणवणूक करणारा व तदनंतर



पैसे देण्यास नकार देणारा प्रसन्न पुलेकर यास मुरुड पोलिसांनी काही दिवसापूर्वी अटक केली होती.जुलै महिन्यापासून अटक असणाऱ्या प्रसन्न पुलेकर याला न्यायायल्याने जमीन मंजूर न केल्याने अलिबाग येथील जेल मध्ये खितपत पडला आहे. सदरचे प्रकरण हे कोट्यवधी रुप्याचे असल्याने मुरुड पोलीस याचा कसून तपास करीत आहेत.मुख्य तक्रारदार महेश भगत यांनी व त्यांच्यासह १३६ जणांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार मुरुड पोलिस ठाण्यात नोंदवली होती.मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा तपास सुरू असून प्रत्येक बाब तपासली जात आहे. कोणतीही बँक नसताना बँके प्रमाणे आर्थिक व्यवहार करणे हा कायदेशीर गुन्हा असल्याने पोलीस याचा कसून तपास करीत आहेत.

प्रसन्न पुलेकर याना लाखो रुपये आर्थिक व्यवहार केलेल्या प्रत्येक व्यक्तीची पोलिसांकडून चौकशी करण्यात येत आहे.मुरुड शहरातील १५ व्यक्तींची कसून चौकशी करण्यात आल्याचे समजत आहे.ज्यांनी ज्यांनी प्रसन्न पुलेकर यांच्याशी लाखो रुपयांचे आर्थिक व्यवहार केले आहेत.असल्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी सांगितले आहे.

## माथेरानमध्ये उबाठा गटाला खिंडार, निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्ते शिवसेनेत



**माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागले असताना माथेरान उबाठा गटाच्या शिवसैनिकांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर मशालची साथ सोडत भगवा हाती घेऊन शिवसेना शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

माथेरान वन ट्री हिल विभागातील उबाठा गटातील असंख्य शिवसैनिकांनी स्थानिक आमदार महेंद्र थोरवेयांच्या कार्यप्रणालीवर आणि शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला.

यावेळी या विभागातील किशोर मोरे, प्रतीक शिंदे, मनोहर चाळके,नारायण कदम आणि त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी जाहीर पक्षप्रवेश केला. शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी, उपशहर प्रमुख प्रमोद नायक,निखिल शिंदे, योगेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

## पाटणसई ग्रामपंचायत कार्यालयासाठी २५ लाख रुपये निधी मंजूर

**नागोठणे : बातमीदार**

खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या विशेष प्रयत्नातून मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेतून नागोठणे जवळील पाटणसई ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी २५ लाख रुपये निधी मंजूर झाल्याचे पत्र रविवार दि. ९ नोव्हेंबर रोजी माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी रोहा पं. स. चे माजी सभापती सदानंद गायकर यांच्याकडे सुपूर्द केले



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभाग अध्यक्ष संतोषभाई कोळी, पाटणसई ग्रामपंचायत सदस्य सचिन कळसकर, बाळकृष्ण देवरे आदी उपस्थित होते. दरम्यान ग्रामपंचायत पाटणसई ग्रामपंचायत कार्यालय बांधण्यासाठी २५ लाखांचा निधी मंजूर झाल्यामुळे ग्रामस्थांनी खा. सुनील तटकरे, ना. आदितीताई तटकरे व अनिकेतभाई तटकरे यांचे आभार मानले आहेत.

राज्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी इमारत योजना शासन निर्णया नुसार मंजूर करण्यात आली आहे. ग्रामीण भागासाठी पायाभूत सुविधांची असणारी आवश्यकता व त्यासाठी उपलब्ध असणारी स्रोतांची मर्यादा विचारात घेऊन शासन निर्णया नुसार योजनेच्या निधी निकषात बदल करून मुदतवाढ देण्यात आली आहे.

# आदिवासी युवकाची गरुडभरारी; एमपीएससी परीक्षेत मिळवले यश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातल्या ऐनाची वाडी या आदिवासीवाडीत राहणाऱ्या वाघ कुटुंबात कुणी शिकले नव्हतं. त्यामुळे मुलाने शिकाव यासाठी विठ्ठल वाघ यांनी मेहनत घेतली. मात्र मुलगा नयन हा कसाबसा दहावीपर्यंत पोहचून त्याला तब्बल तीन प्रयत्न करूनदेखील त्याला यश येत नव्हत. शिक्षणात लक्ष नसलेला नयन वाघ याला पाहून त्याच्या वडिलांनी देखील तो शिकेल ही आशा सोडून दिली. मात्र त्याच्या आयुष्यात आलेले एक शिक्षक त्याच्या आयुष्याला वळण देणारे ठरले. पुढे येणाऱ्या अनेक संकटाचा सामना करून नयन वाघ याने राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देत आदिवासी विभागातून राज्यात १५ वा क्रमांक मिळवला आहे त्याचा हा प्रवास तरुणांसाठी प्रेरणा दायक ठरणारा आहेत. नयनने कर्जत तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

कर्जत तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील बहुतांश भागात आदिवासी लोकवस्ती मोठ्या प्रमाणात आहे. तर या दुर्गम भागात आदिवासी नागरिकांचे चरितार्थ चालवण्यासाठी मोलमजुरी किंवा शेती हाच पर्याय असतो. याच आदिवासी भागात कर्जत तालुक्याच्या एका टोकाला ऐनाची वाडी ही जेमतेम लोकवस्ती असलेली वाडी आहे. साधारण १५० च्या आसपास लोकसंख्या असलेल्या वाडीत विठ्ठल वाघ आणि त्याचं कुटुंब राहत. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि तेच आपल्याला तारु शकतं हे मानणं असलेली विठ्ठल वाघ यांच शिक्षण चौथी पर्यंत झालेलं त्यामुळे आपल्या मुलानी शिकाव अशी त्यांची इच्छा होती. तेव्हा



मोठा मुलगा नयन यासाठी वडिलांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली. मुलाच्या शिक्षणासाठी वडिलांनी मेहनत केली. मात्र नयन याला शिक्षणाची विशेष गोडी नव्हती. त्यामुळे १० च्या परीक्षेत नयन नापास झाला. वडिलांच्या इच्छे खातर त्यांनी आणखी दोन वेळा परीक्षेचा प्रयत्न केला. मात्र त्यातही त्याला यश न आल्याने वडिलांनी देखील मुलगा शिकेल ही आशा सोडून दिली. आणि नयन मजुरी करण्यासाठी जाऊ लागला. शिक्षक असलेले पुंडलिक कंटे यांच्याकडे नयन मजुरीच काम करताना त्यांनी नयन याला शिक्षण विचारलं. नयन १० नापास झाला हे कळल्यावर त्यांनी नयनकडे पुन्हा शिकण्याचा आग्रह धरला. मात्र शिक्षणात रस नसलेल्या नयनला पाहून कंटे सरांनी त्याला शिक्षणच महत्व पटवून देत त्याच्यातील शिक्षणाचा गमावलेला आत्मविश्वास वाढवून देण्याचं काम केलं. त्यामुळे पुन्हा एकदा दहावीतील गेलेले विषय पुन्हा सोडवत नयन वाघ याने दहावी सहज रित्या सोडवली. पुढे सर्व परीक्षा पार करत नयन याने शिक्षणाची कास काही सोडली नाही. बारावीमध्ये महाविद्यालयात त्याने प्रथम क्रमांक मिळवला त्यानंतर कर्जत कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयात पदवीसाठी प्रवेश मिळवत त्याने भूगोल या विषयात पदवी संपादन केली. त्यानंतर सलग तीन वर्षे त्याने पोलिस भरतीसाठी प्रयत्न केले मात्र अनेकदा थोडक्यासाठी संधी हुकली. असे असले तरी नयन याने जिद्द सोडली नाही.

२०१९मध्ये नयन याने राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी तयारी सुरू केली. हे सगळ करत असताना त्याने शिक्षणासाठी मजुरीचे काम देखील सुरू ठेवले तर घरच्यांनी देखील त्याला हातभार लावण्याचे काम केले. याच दरम्यान कोरोनामुळे परीक्षा रद्द झालेल्या होत्या. कसाबसा दहावी काढणारा मुलगा अधिकारी होईल अशी कुणाला आशा देखील नव्हती त्यामुळे घरच्यांनी नयनचे लग्न ठरवलं. पूनम सोबत त्याच लग्न झालं मात्र नयनने आपलं स्वप्न सोडलं नाही. यातच नयन याच्या वडीलांना अर्धांगवायू चा झटका आला. त्यामुळे घराची जबाबदारी देखील होती. आपलं शिक्षण सुटता कामा नये ही मनात असल्याने त्याने २०२२ मध्ये बायकोला माहेरी पाठवत पालघर येथील जिजाऊ शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून लोकसेवा परीक्षेचे शिक्षण सुरू केले. त्याचदरम्यान त्याने पोलिस उपनिरीक्षक परीक्षा देताना शारीरिक चाचणीत पायाला इजा झाली होऊन ती संधी हुकली. या अपघाताने नयनवर संकट आणखी गडद झाले. मात्र वॉकर घेऊन त्याने अभ्यास सुरू ठेवला. २०२४ मध्ये काठी घेऊनच त्याने लोकसेवा आयोगाची पूर्वपरीक्षा दिली. तसेच आदिवासी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था याची स्कॉलरशिपची परीक्षा देखील दिली. यात त्याला यश आल्याने स्कॉलरशिप मिळाली. ही स्कॉलरशिप मैलाचा दगड ठरली. आणि लोकसेवा आयोगाची परीक्षेचा अभ्यास करण आणखी सोप्प झाल्याचं नयन सांगतो. याच माध्यमातून पुणे येथे जाऊन अभ्यास करण्याची संधी मिळाल्याने खाटेवर शिक्षक यांनी त्याला मदत केली. आणि त्यांनी नयनवर घेतलेल्या मेहनतीमुळे नयन महाराष्ट लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात आदिवासी विभागात १५ वा आला आहे.

कुटुंबासह अनेकांनी त्याला या प्रवासात मदत केली असली. तरी नयन याने आपली जिद्द सोडली नाही अनेक संकटांवर मात करून नयन याने आपले स्वप्न पूर्ण केले सोबतच वडिलांची इच्छा देखील पूर्ण केली आहे. यामुळे त्याच्या कौतुकाचा वर्षाव होत आहे. सोबतच त्याचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

### भावाने सांभाळलं घर

*नयन याचा लहान भाऊ राजेश विठ्ठल वाघ याने नयन घरात नसताना त्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेत भावाला तू शिक म्हणत खंबीर पाठिंबा दिला. वडील आजारी त्यात मोठा भाऊ शिक्षणासाठी बाहेर असताना शेती मोलमजुरी करत राजेश याने घर सांभाळलं तर नयन याला जमेल तशी मदत केल्याने नयन याला अभ्यास करताना भावाची मदत झाली.*

*लग्न झाल्यावर सहाच महिन्यात नयन याने लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू केल्याने पत्नी पूनम वाघ हिला माहेरी पाठवून दिली. जेणेकरून तिची परवड व्हायला नको. पूनम ही पदवीपर्यंत शिकलेली असल्याने तिने नवऱ्याची साथ दिली. माहेरी राहून पूनम हिला अनेक संकटाचा सामना करावा लागला. अनेक दिवस माहेर असल्याने नवऱ्याने सोडली असे टोमणे ऐकावे लागले. तरी पूनम हिचा नवऱ्यावर विश्वास होता. त्यामुळे ती देखील नवऱ्याच्या मागे खंबीर उभी राहिली तेव्हा कपडे शिलाई करून मिळणाऱ्या पैशातून तिने पती नयन याला हातभार लावला.*

## निवडक

### टेंभोडे येथील तरुणी बेपत्ता



**पनवेल :** १८ वर्षीय प्रांजल मच्छिंद्र रायकर (रा. ओम न्यू रेसिडेन्सी, टेंभोडे, पनवेल) ही तरुणी बेपत्ता झाल्या प्रकरणी ती हरवली असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिची उंची पाच फूट, सहा इंच, चेहरा उभट, डोळे काळे आहेत. डोक्याचे केस काळे आणि लांब असून ती अंगाने सडपातळ आहे. तिचा रंग सावळा असून पायात काळी ट्रॅक पॅन्ट आणि अंगात पांढरा टी-शर्ट परिधान केली आहे. तिच्या उजव्या हाताच्या दंडावर भावाचा फोटो गोंदलेला आहे. या मुलीबाबत अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार शिवानंद पुजारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी मदत

**पनवेल :** आदर्श शैक्षणिक समूह आणि पदवीधर प्रकोष्टच्या वतीने धनराज विसपुते यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दोन लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या उपस्थितीत दिला. या वेळी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अहोरात्र झटणाऱ्या मुख्यमंत्री यांच्या कार्यात खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा व समाधानाचा क्षण असल्याचे विसपुते यांनी सांगितले. हा धनादेश मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आला.



### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** मॅरेथॉन नेक्सान, ॲन्टेलीया बिल्डींग येथील बी वन पार्कींग पळस्पे येथून एका मोटारसायकलीची चोरी झाल्याची घटना घडली असून याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे. बळीराम रामदास बागवाले यांनी त्यांची १०,००० रुपये किमतीची काळी हिरो होन्डा कंपनीची पेंशन प्रो मोटरसायकल (एमएच ४६ क्यू ९११४) ही बिल्डींगच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची पनवेल शहर पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# रसायनी एमआयडीसी परिसरात रुग्णालयाची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या रासायनिक उद्योगांमुळे, दुर्घटनांमुळे आणि प्रदूषणामुळे स्थानिक नागरिक, कामगार व विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या सुरक्षेबाबत तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सविस्तर कायदेशीर अर्ज सादर करून सरकारी रुग्णालय उभारणीची मागणी केली आहे.

ग्रामस्थांची स्वाक्षरी असलेल्या अर्जात नमूद केले आहे की, रसायनी MIDC परिसरात हजारो कामगार आणि शेकडो नागरिक राहतात. येथे वारंवार होणारे रासायनिक अपघात, वायूगळतीच्या घटना आणि वैद्यकीय सुविधाअभावी जीवितहानीची शक्यता वाढली आहे. त्यामुळे राज्य शासनाने आणि MIDCने सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.




निवेदनात म्हटले आहे की, उद्योगांना सुविधा देताना राज्य आणि MIDCने स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेला प्राधान्य देणे ही कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. कामगारांच्या जीवावर चालणारा औद्योगिक विकास अन्यायकारक आहे.

### आरोग्यासाठी सेवा उपलब्ध व्हावी!

औद्योगिक विकास महत्त्वाचा आहे, पण मानव सुरक्षा त्याहूनही महत्त्वाची आहे. रसायनी MIDCमध्ये रुग्णालय उभारणे हा केवळ आरोग्याचा विषय नाही, तर हा जीवनाधिकाराचा प्रश्न आहे. MIDCने उद्योगांसाठी पायाभूत सुविधा दिल्या, पण कामगार आणि नागरिकांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष केले. आम्ही ही मागणी कायदेशीर व जनहिताच्या मार्गाने पुढे नेत आहोत.

राज्य शासनाने या मागणीला संवेदनशीलतेने आणि तातडीने प्रतिसाद देऊन रुग्णालय स्थापनेची प्रक्रिया सुरू करावी, अशी नागरिकांची एकमुखी मागणी आहे.

## पक्षी सप्ताहनिमित्ताने पक्षी निरीक्षण व जनजागृती कार्यक्रम

**उरण : बातमीदार**

फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) सर्पमित्र निसर्गसंवर्धन संस्था, चिरनेर, उरण-रायगड(महाराष्ट्र) तर्फे कोमना देवी ऑक्सिजन पार्क, सारडे-उरण येथे रविवारी (दि.९) 'पक्षी सप्ताह २०२५' निमित्ताने पक्षी निरीक्षण व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचवेळी सुमारे २७ शालेय विद्यार्थी व रा.जि.प प्राथमिक शाळा, सारडे शाळेच्या मुख्याध्यापिका समृद्धी संजय वऱ्हाडी उपस्थित होत्या.



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयवंत रामदास ठाकूर व फॉन पक्षी सप्ताह २०२५ समन्वयक व सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी अरण्य ऋषी मारुती चितमपल्ली व भारताचे पक्षी मानव डॉ.सालिम अली ह्यांच्याविषयी माहिती सांगितली.

विद्यार्थी व उपस्थित सदस्यांना दुर्बिण व कॅमेरा मध्ये पक्षी दाखविले तसेच 'बर्ड्स ऑफ द इंडियन सबकॉन्टिनेन्ट' या क्षेत्र मार्गदर्शिकेतून पक्षी व त्यांची ओळख कशी केली जाते, याचे प्रात्यक्षिक दाखविले.

पक्षी निरीक्षण करताना सारडे येथे जांभळा शिंजीर, जांभळ्या पुठ्ठ्याचा शिंजीर, पांढऱ्या कंठाची मनोली, मोर शराटी , पांढऱ्या मानेचा करकोचा, धीवर तर शिकारी पक्ष्यांमध्ये मोठा ठिपक्यांचा गरुड, छोटा ठिपक्यांचा गरुड, दलदली भोवत्या, शिक्रा, घार,इ,. पक्षी सुमारे २३ प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजातींची नोंद इ-बर्ड या संकेतस्थळावर करण्यात आली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांसाठी फॉन संस्थेमार्फत अल्पोपहाराची सोय देखील करण्यात आली.

कार्यक्रमासाठी फॉन संस्थेचे सचिव शेखर म्हात्रे, सदस्य प्रीतम पाटील, तुषार म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, फॉन नेक्स्ट जनरेशन हर्षित म्हात्रे, सर्वज्ञ पाटील तसेच संस्थेचे हितचिंतक निलेश पाटील, हर्षद कडू, देवांश कडू आणि सारडे गावातील सामाजिक कार्यकर्ते व निसर्गमित्र संपेश पाटील व सुभाष पाटील आदी उपस्थित होते.

## नमुंमपा आरक्षण सोडत उद्या

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ची आरक्षण सोडत मंगळवार, ११ नोव्हेंबर या दिवशी सकाळी १० वाजता वाशीतील विष्णूदास भावे नाट्यगृह येथे होणार आहे. या कामासाठी आयुक्तांनी उपायुक्त ललिता बाबर यांच्यासह ३ उपायुक्त, मुख्य लेखा परीक्षक, शहर अभियंता, सहाय्यक संचालक नगररचना, सहाय्यक आयुक्त, अधीक्षक आणि २५ वरिष्ठ लिपिक यांची नेमणूक केली आहे.

या निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकाचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढण्यात येणार आहे. तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिद्ध करून हरकती आणि सूचना मागवण्यात येणार आहे. आरक्षणाचे प्रारुप सोमवार, १७ नोव्हेंबर या दिवशी प्रसिद्ध करण्यातर येणार आहे.

# आचारसंहितेआधी 'जनसुविधा', चार कोटींच्या कामांना मंजुरी

**खारघर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात विकासात्मक कामे केली जातात. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आगामी निवडणुका व आचारसंहिता लक्षात घेता निधी अखर्चित राहू नये म्हणून पंचायत विभागाने जनसुविधा योजनेंतर्गत अनेक कामांना मंजुरी दिली जात आहे. रायगड जिल्ह्यात पनवेल तालुक्यासह शेकडो कामांचे प्रस्ताव जिल्हा नियोजनकडे पाठविण्यात आले आहेत.

जनसुविधा योजनेंतर्गत ग्रामपंचायत हद्दीतील विकासकामे केली जातात. जिल्हा परिषद निवडणूक होणार आहे. त्यामुळे कधीही आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे जनसुविधा योजनेच्या कामांना आचारसंहितापूर्वी मंजुरी देण्याची लगबग सुरू आहे. जानेवारीमध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुका पार पडन्याची शक्यता आहे.

जनसुविधा योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये रस्ते आणि दिवाबत्तीची कामे, स्मशानभूमीची सुधारणा, घनकचरा आणि सांडपाण्याची व्यवस्था, तसेच पाणीपुरवठा आणि स्वच्छता यांसारखी कामे केली जातात. या योजनेचा उद्देश गावांमध्ये मूलभूत सुविधा पुरवणे आहे.

जनसुविधा योजना ही ग्रामीण भागात आवश्यक सुविधा पुरवण्यासाठीची एक सरकारी योजना आहे, ज्यामध्ये विशेषतः स्मशानभूमी आणि दहन, दफनभूमीची व्यवस्था करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे आणि घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासारख्या कामांचा समावेश आहे. ही योजना जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केलेल्या निधीतून ग्रामपंचायतीमार्फत राबवली जाते.

रायगड जिल्ह्यात ८१० ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावचा विकास साधला जातो. जनसुविधा योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागातर्फे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे पाठविले आहेत. या कामांना लवकरच मंजुरी देण्यात येणार आहे. पनवेल तालुक्यात ७१ ग्रामपंचायती आहेत. बहुतांशी ग्रामपंचायतीची मुदत संपुष्ठात आलेली आहे.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीच्या कामकाजाचा डिस्ट्रीक्ट चेअरमनकडून आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ही एक सामाजिक महिला संस्था असुन इथे वेगवेगळ्या स्तरांत कार्यरत असणाऱ्या महिला एकत्र येऊन समाजकार्य करतात. ही संस्था मुख्यतः ग्रामीण, जिल्हा, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा चार पातळ्यांवर काम करते व ही कामे अतिशय पारदर्शी व नियमबद्ध पद्धतीने केली जातात त्याचाच एक भाग म्हणून जिल्हाच्या प्रमुख त्या जिल्ह्यातील सर्व क्लबना भेट देऊन त्यांच्या कामाची पडताळणी करतात. त्याच अनुषगांने डिस्ट्रीक्ट ३१३ च्या २०२५-२६ च्या चेअरमन डॉ. आशा देशपांडे यांनी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीला भेट देऊन त्यांच्या कामकाजाची पहाणी केली.



या वेळी ब्लबच्या प्रेसिडेंट सिंपल आंचलिया, सेक्रेटरी युक्ती शहा, खजिनदार ममता ठक्कर, प्रोजेक्ट चेअरमन तसेच झेड ए.सी ध्वनी तन्ना, पास्ट प्रेसिडेंट प्रतिभा डांगी, चार्टर प्रेसिडेंट हेतल बालड, वाईस प्रेजिडेंट नम्रता बांठीया, एडिटर मोसमी गोगुला, आयएसओ स्नेहल कल्याणकर, प्रिया चतुर्वेदी, जॉईन्ट सेक्रेटरी वैशाली कटारिया, कार्यकारिणी सदस्या विजयता कोठारी अशा सर्व कार्यकारिणी तसेच क्लबच्या इतर सदस्यांच्या उपस्थितीत ही भेट अतिशय व्यवस्थीत रीत्या पार पडली.

या वेळी क्लबमार्फत सौ सिंपल व सौ. विजयता यांनी प्रत्येकी ३-३ हजार या प्रमाणे ६ हजार रुपयांची दानराशी दोन मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी आर. जे. शंकरा हॉस्पीटलला दिली. तसेच क्लब मार्फत पनवेलमधील नवकार युवक ग्रुप या संघटनेला ते करत असलेल्या डायलिसीसच्या सेवेसाठी ११००० हजार रुपयांची मदत करण्यात आले. अशा पद्धतीने क्लबला सामाजिक बांधीलकी जपत अवघ्या चार महिन्यांत ५० प्रोजेक्ट पूर्ण करण्याची कौतुकास्पद कामगिरी पार पाडण्यात तसेच डी.सी मॅडम डॉ. आशाजींची कौतुकाची थाप मिळवण्यात यश आले.

## इतना सन्नाटा क्यों है भाई? | ठाण्यात १८ नोव्हेंबरला होणार नाट्यप्रयोग

**पनवेल : वार्ताहर**

६४व्या मराठी राज्य नाट्यस्पर्धेअंतर्गत महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था, नवीन पनवेल आणि रिफ्लेक्शन थिएटर प्रस्तुत तसेच पनवेलचे उद्योजक व गुजराती नाटक निर्माते दिपक मिराणी यांच्या निर्मितीतील सामाजिक आशयाने परिपूर्ण आणि भावविश्वाला भिडणारं इतना सन्नाटा क्यों है भाई? हे नाटक दि. १८ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६:३० वाजता, डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह (मिनी थिएटर), ठाणे येथे रंगणार आहे.

या नाटकाचं लेखन आणि दिग्दर्शन संकेत गायकवाड यांनी केलं असून, आजच्या समाजातील न बोललेले प्रश्न आणि मनुष्याच्या अस्तित्वाला हादरवणाऱ्या सत्यांना भिडणारा हा प्रयोग प्रेक्षकांना अंतर्मुख करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विषयाच्या गूढतेमुळे आणि मांडणीच्या वेगळेपणामुळे रंगभूमी वर्तुळात या नाटकाबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.



पनवेल शहरातील अनेक गुणी कलाकारांच्या प्रभावी सहभागामुळे या नाटकाला एक वेगळी ओळख प्राप्त झाली आहे. या सशक्त निर्मितीचे नाट्यव्यवस्थापक व सूत्रधार मृन्मय काणे, तसेच सोशल मीडिया प्रमुख आणि कास्टिंग डायरेक्टर प्रसाद हनुमंते हे अत्यंत दक्षतेने कार्यरत आहेत. जवळपास २० कलावंतांच्या दमदार अभिनयाने सजलेलं हे सादरीकरण तांत्रिक, दृश्यात्मक आणि भावनिक पातळीवर प्रेक्षकांना भारून टाकेल. नाटकाला विशेष सहाय्य म्हणून पनवेल महानगरपालिका माजी नगरसेवक राजू सोनी, सामाजिक कार्यकर्ते व कलावंत एन. डी. खान, माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, मॉडेल व अभिनेत्री मिस दिपा पुण्यार्थी, अल्ट्रा लुब्रिकंट्सचे सीईओ सिद्धेश सावंत, उद्योजक समीर माखिजा, पत्रकार संतोष आमले आणि इतर मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या सहकार्यामुळे या नाट्यप्रयोगाची व्याप्ती आणि उंची अधिक वाढली आहे.

पनवेलच्या कलाकारांकडून ठाण्याच्या रंगभूमीवर सादर होणारा हा प्रयोग नव्या विचारांना दिशा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जातोय. १८ नोव्हेंबरची सायंकाळ ठाण्याच्या रंगमंचावर एक विचारांना हादरवणारा क्षण ठरणार आहे, अशी रंगभूमीविश्वात चर्चा रंगली आहे.

## नवी मुंबईत मराठी रंगभूमी दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील कलाकारांनी एकत्र येऊन कै. विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी. येथे भावे कट्ट्यावर आद्य नाटककार कै.विष्णुदास भावे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व पूजन करून मराठी रंगभूमी दिन उत्साहात साजरा केला. यानिमित्ताने एकपात्री अभिनय, गीत गायन, नाट्यछटा, मनोगत सादर करण्यात आली.

५० हुन अधिक कलाकारांनी उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीहरी पवळे यांनी केले. पुढील काळातील नवी मुंबईतील रंगभूमी विषयी नियोजन सुनील पगार यांनी केले. उपस्थित सर्व रंगकर्मींनी या वेळी मराठी रंगभूमी दिनी शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर नटराज पूजन ठाणे लोकसभा माजी खासदा डॉ.संजीव नाईक यांनी केले आणि सर्व नवी मुंबईतील रंगकर्मींना पुढील काळात कलाक्षेत्रातील वाटचालीसाठी शुभेच्छा देत भविष्यात नवी मुंबईतील कलाकारांसोबत आम्ही आहोत आणि भविष्यात नवी मुंबईतील कलाक्षेत्रात मोठे कार्यक्रम संमेलन व्हावी व नवी मुंबईतील कलाकारांना प्रोत्साहन मिळावे. ही भावना मनामध्ये असल्याचे सांगत येणाऱ्या काळात पालिका आणि प्रशासनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त कलाकारांना कसा फायदा होईल याबाबत निश्चितच पाठपुरावा करू, असे आश्वास आश्वासित केले.



या वेळी जेष्ठ रंगकर्मी श्रीहरी पवळे, अशोक पालवे, नितीन गुरव, शशी तुपे, सचिन तडाखे, वासंती भगत, मुकुंद महाले, सिद्धार्थ ठोकळे, सुनील पगार, देवा सरकटे, महेश शेळके, सुनील सावंत, सुचिता खाडे, यश आर्या, योगेश कांबळी, विलास गायकवाड, आरती पानसरे, अश्मीक कामठे, क्षमा वराडकर, बडगुजर सर, रंगराव घागरे, संदेश बोबडे, हर्षल राणे, दिलीप जांभळे, बालकलाकार - जय आंब्रे, जितेंद्र लाड, वैभव वराडी, रवींद्र पाटील आदी रंगकर्मी उपस्थित होते.

## ट्रेन पकडताना तरुणाचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

पनवेल-सीएसएमटी मार्गावरील वाशी रेल्वे स्थानकात धावती ट्रेन पकडण्याच्या प्रयत्नात एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. जयेश मळेकर असे मृत तरुणाचे नाव असून, तो कामानिमित्त नवी मुंबईत आला होता.

जयेश गुरुवारी (दि.६) सायंकाळी वाशी रेल्वे स्थानकातील ४ क्रमांकाच्या प्लॅटफॉर्मवर मुंबईकडे जाणारी लोकल पकडण्यासाठी आला. तेव्हा ट्रेन सुरु झाल्याचे पाहून तो धावत गेला, ट्रेनमध्ये चढण्याचा प्रयत्न करत असताना तोल जाऊन ट्रेन व प्लॅटफॉर्मच्या मध्ये असलेल्या जागेतून खाली पडला. या घटनेत त्याच्या डोक्याला आणि शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. उपस्थित प्रवासी आणि रेल्वे कर्मचार्यांनी तातडीने त्याला वाशीतील नवी मुंबई मनपा रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. रेल्वे पोलिसांकडून मिळालेल्या अधिकच्या माहितीनुसार, जयेश चे वय ४१ वर्षे असल्याचे सांगितले जात आहे. तर तो मूळचा मुंबई सेंट्रलचा रहिवासी असून, कामानिमित्त नवी मुंबईत आल्याची माहिती मिळाली आहे.

## दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थेतर्फे कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

वंदे मातरम् या आपल्या राष्ट्रगीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या औचित्याने राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई येथे विविध सांस्कृतिक, देशभक्तिपर व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

हा संपूर्ण उपक्रम डॉ. रवी प्रकाश सिंग, प्रभारी अधिकारी, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात बौद्धिक दिव्यांग विद्यार्थी, त्यांच्या पालक, प्रशिक्षणार्थी शिक्षक, व्याख्याते व कर्मचारी वर्ग यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वंदे मातरम् १५० वर्षे या विषयावर आयोजित थेट प्रक्षेपण दाखवून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आणि प्रशिक्षणार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने हे थेट प्रक्षेपण पाहिले व त्यातून देशभक्तीचे, राष्ट्राभिमानाचे संदेश आत्मसात केले.

सर्व सहभागींच्या हातात वंदे मातरम्, भारत माता की जय या घोषवाक्यांनी सजलेले आकर्षक फलक व पोस्टर होते. रॅलीदरम्यान देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमला आणि देशप्रेमाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. यानंतर, प्रशिक्षणार्थ्यांसाठी वंदे मातरम् या विषयावर रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या सृजनशीलतेचा व देशभक्तीचा सुंदर संगम साधत विविध विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. त्याचबरोबर, वंदे मातरम् या विषयावर आधारित ज्ञानवर्धक प्रश्नमंजुषादेखील आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या प्रशिक्षणार्थींना डॉ. रवी प्रकाश सिंग, प्रभारी अधिकारी, राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांमध्ये बौद्धिक दिव्यांग विद्यार्थी, त्यांचे पालक, प्रशिक्षणार्थी शिक्षक, तसेच संपूर्ण अध्यापक व कर्मचारी वर्ग यांनी सक्रिय सहभाग नोंदवून कार्यक्रमाला उत्सवी रंगत आणली. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी समन्वयन प्रा. ज्योती खरात, व्याख्याता, विशेष शिक्षण विभाग यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे आणि सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी ठरला.



# रोह्यात धुक्याच्या आडून प्रदुषणाचा मारा

## कारखानदारांकडून पहाटेस चाले खेळ!



**रोहा : प्रतिनिधी**

यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे वातावरण पाऊसमय झाले होते. पाऊस लांबल्यामुळे हिवाळा ही लांबल्याची जाणीव होत असताना गेली दोन दिवस रोहा परिसरात हळूहळू हिवाळ्याची चाहूल लागली असून सकाळच्या वेळी दाट धुक्याने संपूर्ण परिसर पांघरूण घेतला आहे. सकाळी लवकर बाहेर पडणाऱ्या नागरिकांना व शालेय विद्यार्थ्यांना या धुक्यामुळे वाहन व सायकल चालवताना अडचणी येत आहेत. सकाळी मात्र वातावरणात गारवा आल्याचे दिसून येते.

सकाळी पडत असलेल्या या दाट धुक्याचा फायदा घेत धाटाव औद्योगिक क्षेत्रातील काही कारखानदारांकडून रसायनयुक्त धुर वातावरणात सोडण्यात येत आहे. गुपचूप धुक्याचा आसरा घेत रासायनिक धुर हवेत सुरू असल्याची स्थानिक नागरिकांत चर्चा आहे. धुक्यामुळे धुर सहज दिसत नसल्याने पर्यावरणावर होणारा परिणाम लपविला जात असल्याची नागरिकांकडून बोलले जात आहे.

शहर व औद्योगिक परिसरात सकाळी हवेत जाणवणारा रासायनिक वास आरोग्यास हानिकारक ठरत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन हवेत रासायनिक वायू सोडणाऱ्या कारखानदारांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडुन होत आहे.

# पेण एसटी स्थानकात महिलेचे गंठण लांबविले

**पेण : प्रतिनिधी**

पेण एसटी स्थानकात पेण ते पंढरपूर प्रवास करणाऱ्या महिलेचे एसटी स्थानकात अज्ञात चोरट्याने गंठण लांबविल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी वर्षा गणेश पवार (वय ३८, रा. ढवळे इमारत मागे, सगुनमाता नगर फलटण, जि.सातारा) या त्यांच्या मुलीसह २ नोव्हेंबर रोजी पेण एस.टी. बस स्थानकातून सकाळी १२.४०च्या सुमारास अलिबाग ते फलटण पंढरपूर जाणारी बस क्र. एम.एच.१३/सी.यु. ६९९२ या बसमध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे गळयातील एकूण ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण स्वतःच्या फायद्याकरीता चोरून नेला.

याबाबत फिर्यादी वर्षा पवार यांनी मंगळवार दिनांक ७ नोव्हेंबर रोजी पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केती. या वेळी घटनास्थळी पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी भेट देऊन आढावा घेतला.

याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार सुशांत भोईर हे करीत आहेत.

# 'साई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीसाठी निकषापेक्षा जास्त निधी देऊ'

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील साई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीसाठी निकषापेक्षा जास्त निधी उपलब्ध करून साई पांचक्रोशीतील हे आरोग्य केंद्र सर्व सुविधांनी सुख सोईस्कर करून परिसरातील नागरिकांची सोय करू, असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी साई येथील कार्यक्रमात बोलताना उपस्थितांना केले.



साई येथील साई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारत बांधकामचा भूमिपूजन समारंभ शनिवार ८ नोव्हेंबर २०२५ रोजी खासदार सुनील तटकरे व महिला व बालविकास कल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते उत्साहात झाला. त्यावेळी खा. सुनिल तटकरे, आदिती तटकरे यांनी उपस्थितांना मौलिक असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमावेळी रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष काका नवगणे, महिला राष्ट्रवादीच्या माणगाव तालुकाध्येक्षा संगीता बक्कम, ज्येष्ठ नेते महादेव बक्कम, हिराचंद्र तांबे, गजानन अधिकारी, रमेश मोरे, माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, तालुका राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष राजू मोरे साई सरपंच हवाबी राहटविलकर, अल्ताफदादा धनसे, शादाब गैबी, उदय अधिकारी, दीपक जाधव, संदेश मालोर, महेश महाजन, तालुका आरोग्य अधिकारी माणगाव डॉ. विनोद गोरेगावकर, रायगड जिल्हा प्रभारी आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर, मोर्बा सरपंच जनाब रोहेकर, विहुले सरपंच अस्मिता केबळे, ऋतिका गायकवाड साई ग्रामपंचायततिचे उपसरपंच, सदस्य उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करतेवेळी खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, साईमधील विकास कामाची गंगा आणतेवेळी पाझर तलाव, साई ग्रामपंचायतीची इमारत, साई अंतर्गत रस्ते, साई पंचक्रोशी न्यानदीप विद्या मंदिराची इमारत, अशातच साई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीसाठी पाच कोटी १६ लाखाचा निधी उपलब्ध करून साई पंचक्रोशी तील नागरिकांना सुविधा करून देण्याचे मला भाग्य लाभले.

या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्र समितीचे अधिकारी, कर्मचारी, परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# कोकणातून वारकरी पायी दिंड्यांचे आळंदीकडे प्रस्थान

**चौक : प्रतिनिधी**

कोकणातून वारकरी संप्रदाय यांच्या कार्तिकी एकादशीची आळंदीवारी यांचे प्रस्थान सुरू झाले असून रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यातून सुरू झाल्या. या पायी दिंड्यांचे गाओ गावी मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे. त्यावेळी गावात प्रवचन, हरिपाठ, कीर्तन होते, ग्रामस्थ यांच्याकडून अन्नदान केले जाते. चातुर्मासाच्या निद्रेनंतर भगवान विष्णू (विठ्ठल) जागे होतात, असे म्हटले जाते.

या दिवशी भगवान विष्णू चातुर्मासातील त्यांच्या निद्रेतून जागे होतात असे मानले जाते. आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही हजारो वारकरी आळंदीला दर्शनासाठी पायी चालत जातात. कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवसापासून वारीला सुरुवात होते.

कार्तिकी एकादशीला आळंदीत येऊन वारकरी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतात. आषाढी एकादशीला आळंदीहून पंढरपूरकडे वारी जाते, तर कार्तिकी एकादशीला पंढरपूरहून आळंदीकडे वारी परत येते, असेही काही जण मानतात. या दिवशी हजारो भाविक आळंदीत दाखल होतात आणि संजीवन समाधी सोहळ्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने वारकरी आळंदीला संत ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेण्यासाठी येतात.



# श्रीवर्धनमधील कोळंबेकर दाम्पत्याचा शिवसेनेत प्रवेश

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील रानवली येथे झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमामुळे तालुक्यातील राजकीय वातावरण तापले. महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत, शिवसेना (उबाठा) गटाचे माजी तालुकाप्रमुख आणि माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश कोळंबेकर, तसेच त्यांच्या पत्नी माजी जिल्हा परिषद सदस्या व माजी महिला व बालकल्याण सभापती अक्षदा कोळंबेकर यांनी आपल्या मोठ्या कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.



कोळंबेकर दाम्पत्याचा ग्रामीण भागात दांडगा जनसंपर्क आणि संस्थात्मक कामांचा भक्कम पाया असल्यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्याशी एकनिष्ठता राखत शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे शिवसेना (उबाठा) गटाला मोठे राजकीय खिंडार पडल्याचे मानले जात आहे.

कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना अविनाश कोळंबेकर म्हणाले, गटात काम करण्याची जागाच उरली नव्हती. घुसमट होत होती. विकास आणि कार्यकर्त्यांचा सन्मान या दोन्ही गोष्टींना न्याय देण्यासाठी आम्ही शिवसेना निवडली.

या कार्यक्रमात बोलताना भरत गोगावले यांनी कोणाचेही नाव न घेता संकेतार्थी टीका करताना सांगितले की, आम्ही नीतिमत्तेने काम करतो. दिलेल्या कामाला न्याय देतो. महायुतीच्या धोरणाशी प्रामाणिक राहून आम्ही प्रयत्न केले नसते, तर आज परिस्थिती वेगळी दिसली असती. त्यांच्या या विधानाचा संदर्भ उपस्थितांमध्ये मोठ्या चर्चेचा विषय ठरला.

व्यासपीठावर जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उपजिल्हाप्रमुख सुरेश महाडिक, सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तसेच आप्पा सावंत आदी उपस्थित होते.

# होनाड गावात कचरा वर्गीकरण गाडी उपलब्ध

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील होनाड ग्रामपंचायत कचरा निर्मूलनाचा प्रश्न या ठिकाणी मोठा होता आणि हीच समस्या ग्रामपंचायतीचे भाजपचे सरपंच प्रकाश पाटील यांना सतावत होती. यातील मूळ मुद्दा होता तो ओला आणि सुका कचरा एकत्र करण्यासाठी जागा उपलब्ध होत नव्हती.



यासाठी नवीन जागा खरेदी करणे म्हणजे अतिशय महागडा प्रकल्प म्हणून ठरला असता. त्यातूनच मार्ग कसा काढावा या विचारात सरपंच प्रकाश पाटील असताना एका गोष्टीवर लक्ष केंद्रित केले ते तीनही गावाच्या स्मशानभूमीवर गावापासून दूर आणि रस्त्याचा मोठा प्रश्न होता या स्मशानभूमीला होता. या समसयेतूनच या कचराडेपोचा उदय झाला. पहिल्यांदा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून होनाड, चिंचवळी गोहे आणि टेंबेवाडी या तीनही गावांच्या मध्यस्थानी असलेल्या नदीशेजारी भव्य अशी विविध सुविधासहित सज्ज असलेली वैकुंठ धाम स्मशानभूमी उभारली. त्यानंतर होनाड गावाची स्मशानभूमी असलेल्या जागेत अगदी थोड्या प्रमाणात आणि कमी खर्चात बदल करीत कचराडेपो तयार केला. याआधी सरपंच प्रकाश पाटील यांनी आपले वैयक्तिक संबंध वापरीत ए ए कमानी या कारखाण्याकडून सीएसआर उपक्रमाअंतर्गत ग्रामपंचायतीसाठी कचरा गाडी मिळविली होती.

कचराडेपोसाठी लागणाऱ्या जागेचा प्रश्न सुटल्यानंतर लगेचच तीनही गावांमध्ये कचरागाडी फिरवीत कचरा गोळा करण्यास सुरुवात केली आणि अनेक वर्षे प्रलंबित असलेला कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावला. गावांमधून कचरा बाहेर जाऊ लागला असल्याने गावात अधिक प्रमाणात स्वच्छता वाढली असल्याचे दिसत आहे. तर गृहिणींना कचरा कुठे टाकावा हा प्रश्न आता पडत नसल्याने त्यांनीही समाधान व्यक्त करीत सरपंच प्रकाश पाटील यांचे आभार मानले.

# तटकरे महाविद्यालयात वंदे मातरम् गायन, स्वच्छता अभियान

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे महाविद्यालय माणगाव रायगड राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित ७ नोव्हेंबर २०२५ रोजी वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याने सामूहिक वंदे मातरम गीत व जनजागृती कार्यक्रम झाला. व त्याचबरोबर महाविद्यालयांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



या कार्यक्रमासाठी अध्यक्ष स्वरूपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी एम खामकर उपस्थित होते. राष्ट्रभक्तीची, राष्ट्रकर्तव्याची, प्रेरणा स्फूर्ती स्थान हे वंदे मातरम गीतामधून मिळते असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व स्वयंसेवक, महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. वंदे मातरम या गीताने संपूर्ण देशामध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणा, जनजागृती, या गीताची असणारी ऐतिहासिक पार्श्वभूमी, या कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आली व महाविद्यालयामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

स्वच्छता अभियानासाठी १७२ विद्यार्थी व स्वयंसेवक, व ३० प्राध्यापक उपस्थित होते. संपूर्ण नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नेहा तुराई, व प्रा.स्वप्निल सकपाळ त्यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

# माणगाव तालुक्यात औद्योगिक विकासाचा नवा युगारंभ

## ■ कोकणातील रोजगार, गुंतवणूक आणि प्रगतीचे बनतेय केंद्र

**माणगाव : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका हा निसर्गरम्य डोंगरदऱ्या, नद्यांचे संगम आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. हा परिसर आता औद्योगिक प्रगतीचा नवीन अध्याय लिहित आहे. एकेकाळी शेतीप्रधान असलेल्या या भागाने गेल्या दोन दशकांत उद्योग, शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय झेप घेतली आहे. यामुळे माणगाव तालुक्यातील लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहे. रोजगार निर्मितीमध्ये कमालीची वाढ झाली आहे.

माणगाव तालुका मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग, दिघी–माणगाव–पुणे महामार्ग आणि रेल्वेमार्ग यांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने वाहतुकीस अत्यंत अनुकूल आहे. भविष्यात सागरी आणि ग्रीन फिल्ड एक्स्प्रेस महामार्ग सुरू होणार आहे. या भौगोलिक लाभांमुळे अनेक औद्योगिक गुंतवणूकदारांनी येथे कारखाने उभारले आहेत. माणगाव रोह्याचे तत्कालीन आमदार अशोक साबळे यांच्या अथक प्रयत्नाने १९९०च्या दशकात विळे आणि भागाड येथे माणगाव औद्योगिक वसाहतीची स्थापना झाली. त्यावेळी काहीच उद्योग होते, पण आज या वसाहतीत शेकडो छोटे–मोठे उद्योग फुलत आहेत.

माणगाव एमआयडीसी आणि आसपासच्या परिसरात विविध प्रकारचे उद्योग सुरू झाले आहेत. रासायनिक व औषधनिर्मिती उद्योग, काच, सोल्व्हेंट, पेंट, फार्मास्युटिकल्स यांचा मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणार आहे. अन्नप्रक्रिया उद्योग, कोकणातील फळे, आंबा, काजू, फणस, नारळ यावर आधारित मूल्यवर्धित उत्पादने, प्लास्टिक आणि मोल्डिंग उद्योग महाराष्ट्रातील आणि परदेशातील ग्राहकांना निर्यात, इंजिनिअरिंग व फॅब्रिकेशन उद्योग, औद्योगिक उपकरणे, यंत्रसामग्री निर्मिती, नवीन उर्जाविषयक उद्योग सौर उपकरणे, बॅटरी पॅनल, ग्रीन एनर्जी उत्पादने आदी उत्पादन सुरू होणार आहेत.

माणगाव एमआयडीसीमध्ये सुरू झालेल्या उद्योगांमुळे हजारो युवकांना रोजगार मिळाला आहे. स्थानिक तांत्रिक शिक्षण घेतलेले तरुण आता अभियंते, सुपरवायझर, ऑपरेटर म्हणून काम करत आहेत. महिलांसाठी गृहउद्योग व पॅकिंग युनिट्स सुरू झाल्याने आर्थिक स्वावलंबनाची नवी दारे उघडली आहेत. ग्रामीण भागातील कामगारांना प्रशिक्षण देऊन उद्योगक्षेत्रात सामावून घेतले जात आहे.

माणगावजवळच असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे हे या प्रगतीचे मुख्य कारण ठरले आहे. येथील विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रकल्पांमध्ये थेट सहभागाची संधी मिळते. विद्यापीठ व उद्योगांमधील सहकार्यामुळे संशोधन, इंटर्नशिप आणि स्टार्टअप संस्कृती वाढली आहे.

औद्योगिक विकासाबरोबरच पर्यावरणीय संतुलन राखण्यावर भर दिला जात आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. औद्योगिक वसाहतीत वृक्षारोपण आणि हरित पट्टे विकसित केले गेले आहेत. अनेक कंपन्या झीरो डिस्चार्ज इंडस्ट्री म्हणून कार्यरत आहेत.

राज्य शासनाच्या मॅग्नेटिक महाराष्ट्र आणि मेक इन इंडिया या उपक्रमांतर्गत माणगावला विशेष प्रोत्साहन मिळाले आहे. अनेक कंपन्यांनी पुढील काही वर्षांत येथे उत्पादन युनिट्स उभारण्याचे करार केले आहेत.

माणगाव एमआयडीसीमधील पोस्को आणि अनेक उद्योग सीएसआर अंतर्गत समाजकार्यात पुढाकार घेत आहेत. शाळांना डिजिटल शिक्षण साधने पुरवणे, वृक्षारोपण व आरोग्य शिबिरे महिला स्वावलंबन प्रशिक्षण केंद्र, विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक मार्गदर्शन व शिष्यवृत्ती देण्यात येत आहे.

माणगाव तालुका आज केवळ एक औद्योगिक केंद्र नसून तो ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा चेहरा बनत आहे. येथील उद्योग, शिक्षण आणि मानवी संसाधन यांचा संगम कोकणाच्या विकासाची दिशा निश्चित करतो. उद्योग हा प्रगतीचा पाया आहे आणि माणगाव हा त्या पायाचा दृढ आधार आहे, असे म्हणायला हरकत नाही.

### *महत्त्वाचे आगामी प्रकल्प*

*सौर ऊर्जा उपकरण निर्मिती प्रकल्प, फार्मा उत्पादन केंद्र, अन्नप्रक्रिया व निर्यात हब लॉजिस्टिक आणि गोदाम सुविधा केंद्र, पायाभूत सुविधा सुधारणा, औद्योगिक वाढीसोबतच माणगाव शहर आणि परिसरात पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. विस्तारित रस्ते व पुलांचे बांधकाम, २४ तास वीज व पाणीपुरवठा, जलशुद्धीकरण प्रकल्प, औद्योगिक अग्निशमन केंद्र, नव्या निवासी वसाहतींची उभारणी केली जात आहे.*

### भविष्याचा रोडमॅप

*माणगाव तालुका पुढील काही वर्षांत कोकणातील सर्वाधिक प्रगत औद्योगिक क्षेत्र म्हणून उदयास येण्याच्या मार्गावर आहे. नव्या गुंतवणुकीमुळे रोजगार, व्यापार, आणि जीवनमानात मोठा बदल होईल. केंद्र सरकार, राज्य शासन, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक नेतृत्व खासदार सुनील तटकरे यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे माणगाव हे ग्रीन इंडस्ट्रियल हब बनविण्याचे उद्दिष्ट पुढे ठेवण्यात आले आहे.*

# वळके येथील विद्या मोरे ठरल्या 'होम मिनिस्टर'

**रेवदंडा : प्रतिनिधी**

वळके येथे महिलांच्या उत्साहात पार पडलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमात प्रथम क्रमांकाचा मानकरी विदया गणेश मोरे ठरल्या, तर कविता हेमंत पाटील–व्दितीय, सुरेखा संदिप पाटील तृतीय क्रमांक पटकाविला. भाजप जिल्हा महिला उपाध्यक्षा व समर्थ फांउडेशनच्या अध्यक्षा ॲड. मनस्वी महेश मोहिते यांच्या संकल्पनेतून वळके येथे महिलासाठी होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता.



वळके येथील मंदिराचे प्रागंणात शुक्रवार दि. ७ नोव्हेबर २०२५ रोजी सायकांळी चार वाजता शिवसेना नेत्या, माजी जि.प. सदस्या मानसी दळवी यांच्या हस्ते महिलासाठी होम मिनिस्टर कार्यक्रमाचा दिपप्रज्वलन व शिवप्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. या वेळी भाजप जिल्हा महिला उपाध्यक्षा व समर्थ फांउडेशनच्या अध्यक्षा अँड मनस्वी महेश मोहिते, शिवसेना महिला जिल्हा संघटक संजिवनी नाईक, वळके ग्रा.प. सरपंच प्रिया म्हात्रे, तसेच भाजप पदाधिकारी कार्यकर्त्या वृदा राजगे, सोनाली वाडेकर, शर्मिला पाटील, भाग्यश्री पाटील, नेत्राजंली राजगे, ज्योती मयेकर, रिया भगत, हेमिका भगत, सुवर्णा चवरकर, निकिता चवरकर, सुचिता घाग, तृप्ती घाग, मेघा कोतवाल, कल्पना अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती तर कार्यक्रम दरम्यान भाजप दक्षिण जिल्हा महिला अध्यक्षा चित्रा आस्वाद पाटील या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन अँड महेश मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

होम मिनिस्टर कार्यक्रमाचे मुख्य संकलन प्रितम सुतार व विनोद नाईक यांनी केले, यावेळी महिलासाठी विविध खेळाचे आयोजन करण्यात आले, यामध्ये होम मिनिस्टर प्रथम क्रमांक विदया गणेश मोरे ठरल्या, तर कविता हेमंत पाटील–व्दितीय, सुरेखा संदिप पाटील तृतीय क्रमांक पटकाविला तसेच आशा बाळकृष्ण सातामकर, गुलाब भोय व मालती परशुराम सातामकर या साठ वर्षावरील महिला अखेरच्या लकी ड्रॉ मध्ये बक्षिसपात्र ठरल्या. यामधील विजेत्यांना पैठणी साडया प्रदान करून चित्रा पाटील, ड मनस्वी मोहिते, अँड महेश मोहिते यांचे हस्ते गौरविण्यात आले. तर महिला प्रेक्षकातून घेण्यात आलेल्या कुपन लकी ड्रॉ मध्ये हिराबाई लक्ष्मण मोरे–वळके, राजश्री चंद्रकांत धनावडे–शिरगाव,बायाबाई हरिश्चंद्र ठाकूर शिरगांव, मंगळ धनजंय म्हात्रे–वळके, वर्षा हेमंत भोय–सार्तिजे, गंभू परशुराम भोईर–शिरगाव, पदी हिराजी भगत–वळके, संगिता बाळकृष्ण पाटील–वळके, विदया गणेश मोरे–वळके, मंदाताई कमलाकर म्हात्रे–वळके या बक्षिस पात्र ठरल्या. या बक्षिसपात्र महिलांना विविध वस्तू भेट मान्यवराचे हस्ते देण्यात आले.

# राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर विभाग सांघिक विजेता

## एकूण २४० खेळाडूंचा सहभाग; पुणे विभाग उपविजेता

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील महाराजा मंगल कार्यालयाच्या काशी स्पोर्ट्स सेंटर येथे नुकतीच १७ वर्षाखालील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा जल्लोषात पार पडली. राज्यभरातील तब्बल २४० मुला-मुलींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. फ्री स्टाईल आणि ग्रिको-रोमन पद्धतीच्या विविध वजनी गटांत सामने रंगले. सरतेशेवटी कोल्हापूर विभाग सांघिक विजेता, तर पुणे विभाग उपविजेता ठरला.



या भव्य स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी विक्रम साबळे फाऊंडेशनचे अध्यक्ष विक्रम साबळे, डॉ. समर्थ मनुकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मारूती आडकर तसेच रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ आणि राज्य क्रीडा मार्गदर्शक निळकंठ आखाडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कुस्ती क्रीडा प्रकाराला अधिक चालना देण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन परेश ठाकूर यांनी दिले. त्यांनी पुढे सांगितले की, खोपोली परिसरात कुस्ती प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. यामुळे नवोदित खेळाडूंना व्यासपीठ व प्रोत्साहन मिळेल.

स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती न्यास आणि काशी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. स्पर्धा प्रमुख राजाराम कुंभार, निरीक्षक संदीप वांजळे, दत्ता माने तसेच तांत्रिक प्रमुख जगदीश मरागजे यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात मोलाचा वाटा उचलला.

स्पर्धेस टाटा स्टील कंपनीचे शशी भूषण, भावेश रावळ, सौरभ शर्मा, रिन्युसेस कंपनीचे चंद्रकांत मोडक, निलेश साळुंखे उपस्थित होते.

स्पर्धेत कोल्हापूर विभागाच्या मुलींनी सहा सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदके मिळवत सांघिक विजेतेपद पटकावले; तर मुलांनी सहा सुवर्ण, तीन रौप्य, सात कांस्यपदकांसह वर्चस्व गाजवले. पुणे विभागाच्या मुलींनी तीन सुवर्ण, चार रौप्य, एक कांस्य आणि मुलांनी चार सुवर्ण, चार रौप्य, सहा कांस्यपदकांसह सांघिक उपविजेतेपद मिळवले.

### प्रशिक्षकांचा विशेष सन्मान

स्पर्धा आयोजन समितीच्या वतीने कुस्ती क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त करणाऱ्या प्रशिक्षकांचा महाराष्ट्राचे द्रोणाचार्य असा विशेष सन्मान करण्यात आला. या मानकरी प्रशिक्षकांमध्ये दादा लवटे, संदीप पाटील, संदीप पठारे, अमोल यादव, नागेश राक्षे, किरण मोरे, संपती येळकर, विजय चव्हाण आणि दिवेश पालांडे यांचा समावेश होता.

# मुंबई विभागीय डॉजबॉल स्पर्धेत एमएनएम विद्यालय उपविजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत जुनिअर कॉलेजचे विद्यार्थी मुंबई विभागीय आंतरशालेय डॉजबॉल स्पर्धेत उपविजेते ठरले आहेत. मुंबईच्या कांदिवली उपनगरातील ऑक्सफर्ड इंग्लिश स्कूल येथे घेण्यात आलेल्या या डॉजबॉल स्पर्धेत एमएनएम स्कूलने १९ वर्षाखालील मुलांच्या गटात हे यश मिळविले.

जिल्हास्तरावरील विजेते आणि उपविजेतेपद प्राप्त केलेल्या संलग्न शाळातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. एमएनएम स्कूलचे आर्यन रामदास नाईक, प्रयास कोळी, ओंकार भरत पाटील, श्रेयश दुधाने, आर्यन गोंधळी, स्मित ठाकूर, प्रियांशू निषाद, दक्ष बसताव, पारस भोईर, सुबूज दास या विद्यार्थ्यांच्या संघाने उपविजेतेपद पटकाविले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षका प्रणिता गोळे, अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षिका वर्षा नलावडे, वामन कुऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते.



# जागतिक नेमबाजीत स्पर्धेत रवींद्र सिंगला सुवर्णपदक

**कैरो : वृत्तसंस्था**

कैरो (इजिप्त) येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ रायफल/पिस्तूल जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रवींद्र सिंगने पुरुषांच्या ५० मीटर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकून भारताला पहिले यश मिळवून दिले.




स्पर्धेत २९ वर्षीय रवींद्र याने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले आणि ५६९ गुणांच्या प्रभावी स्कोअरसह तो विश्वविजेता ठरला. रौप्यपदक विजेता किम चेओंगयोंग हा भारतीय नेमबाजापेक्षा १३ गुणांनी कमी म्हणजे ५५६ गुणांवर राहिला. रवींद्रसाठी सलग दुसरे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील यश ठरले. यापूर्वी त्याने २०२३मध्ये बाकू येथे झालेल्या स्पर्धेत याच ५० मीटर पिस्तूल प्रकारात ५५६ गुणांसह कांस्यपदक जिंकले होते.

रवींद्रच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारतीय पुरुषांच्या ५० मीटर पिस्तूल सांघिक गटालाही रौप्यपदक मिळाले. भारताने १६४६ गुणांची एकत्रित नोंद केली. ही कामगिरी सुवर्णपदक विजेत्या दक्षिण कोरियापेक्षा केवळ दोन गुणांनी कमी होती. कमलजित (५४०) आणि योगेश कुमार (५३७) हे या प्रकारातील भारतीय त्रिसदस्यीय संघाचे अन्य सदस्य होते.

यादरम्यान दोन वेळची ऑलिम्पियन असलेल्या एलावेनिल वलारिवानने महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात अंतिम फेरीत चित्तथरारक कामगिरी करत कांस्यपदक मिळवत भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. ऑलिम्पिक प्रकारातील या स्पर्धेच्या अंतिम फेरीत २६ वर्षीय एलावेनिलने सुरुवातीला आघाडी घेऊन सुवर्णपदाची आशा निर्माण केली होती, मात्र नंतर २२व्या शॉटवर ९.९ गुणांची खराब नोंद करत तिला २३२.० गुणांसह तिसर्या स्थानावर समाधान मानावे लागले. दक्षिण कोरियाच्या बान हायोजिनने २५५.० गुणांसह सुवर्णपदक जिंकले, तर चीनच्या वांग झिफीने २५४.० गुणांसह रौप्यपदक पटकावले.

# वेगवान चेंडू थेट खेळाडूच्या हेल्मेटला लागला

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियात वूमेन्स बिग बॅश लीग स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत सिडनी थंडर्स संघाची २२ वर्षीय फलंदाज जॉर्जिया वोलने डावाची सुरुवात करताना १५ धावांची खेळी केली. या सामन्यात फलंदाजी करताना तिने यष्टीरक्षकाच्या डोक्यावरून आगळावेगळा फटका मारण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान चेंडू तिच्या हेल्मेटला जाऊन लागला. दरम्यान डगआऊटमध्ये बसलेल्या फोबी लिचफिल्डने दिलेल्या मजेशीर रिक्शन सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, वेगवान गोलंदाजासमोर जॉर्जिया वोल रँप शॉट मारण्याचा प्रयत्न करते. त्यावेळी तिला चेंडूच्या गतीचा अंदाज येत नाही. त्यामुळे चेंडू थेट तिच्या हेल्मेटला जाऊन लागला. चेंडू लागताच तिचा तोल जातो आणि ती खाली पडते. हे पाहून संघातील खेळाडूंना हसू आवरले नाही.

हा चेंडू वेगाने आला होता. त्यामुळे ती गंभीर दुखापतग्रस्त होऊ शकली असती, पण नशिबाने ती थोडक्यात बचावली. आधी डगआऊटमधील खेळाडू घाबरले. त्यानंतर त्यांना हसू आवरले नाही. तिची सहखेळाडू फोबी लिचफिल्डने दिलेली रिक्शन सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

# ध्रुव जुरेलची पुन्हा दमदार शतकी खेळी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारतीय संघातील युवा विकेटकिपर बॅटर ध्रुव जुरेल सध्या कमालीच्या फॉर्ममध्ये दिसतोय. वेस्ट इंडिजविरुद्धच्या सामन्यात कसोटी कारकिर्दीतील पहिले शतक झळकवणाऱ्या या पठ्ठ्याने दक्षिण आफ्रिका 'अ' विरुद्धच्या सामन्यात भारत 'अ' संघाकडून सलग दुसरी सेंच्युरी ठोकली आहे.




भारत 'अ' विरुद्ध दक्षिण आफ्रिका 'अ' यांच्यातील दुसरा अनौपचारिक कसोटी सामना बंगळुरूस्थित बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलेन्सच्या ग्राउंडवर खेळवण्यात येत आहे. पहिल्या डावात १३२ धावांची नाबाद खेळी करणाऱ्या ध्रुव जुरेल याने दुसऱ्या डावात १२७ धावांची नाबाद खेळी केली. युवा विकेट किपर बॅटरची ही कामगिरी आगामी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात प्लेइंग इलेव्हनमधील दावेदारी भक्कम करणारी अशीच आहे. त्याच्या धडाकेबाज कामगिरीमुळे ऋषभ पंतचे कमबॅक झाले असताना त्याच्यासाठी संघात जागा कशी करायची? हा मोठा तिढा आता भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांना सोडवावा लागणार आहे.

द. आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यातील पहिल्या डावात ध्रुवच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर भारतीय संघाने पहिल्या डावात २५५ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना आफ्रिकेचा संघ पहिल्या डावात २२१ धावांवर आटोपला. ३६ धावांच्या अल्प आघाडीसह भारतीय संघाने दुसऱ्या डावाची सुरुवात केली. या डावात कर्णधार पंतने अर्धशतक झळकावले, पण पुन्हा एकदा टीम इंडियाकडून ध्रुव जुरेलच्या बॅटमधून सर्वोच्च खेळी आली.

ध्रुव जुरेल याने दुसऱ्या डावात हर्ष दुबेच्या साथीने सातव्या विकेटसाठी २५० चेंडूत १८४ धावांची भागीदारी रचली. हर्ष ८२ धावांवर धावबाद झाला. त्यानंतर ध्रुवने सलग दुसऱ्या डावात शतकाला गवसणी घातली. भारतीय संघाने सात बाद ३८२ धावांवर डाव घोषित करत दक्षिण आफ्रिकेच्या संघासमोर ४१७ धावांचे टार्गेट सेट केले आहे. ध्रुव या डावातही १२७ धावा करून नाबाद परतल्याचे पहायला मिळाले.

दरम्यान, ध्रुवच्या या जबरदस्त कामगिरीमुळे १४ नोव्हेंबरपासून कोलकात्यात खेळल्या जाणाऱ्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत त्याचे खेळणे जवळपास निश्चित मानले जात आहे. वृत्तसंस्था पीटीआयच्या हवाल्याने बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, ध्रुव हा स्पेशलिस्ट बॅट्समन म्हणून खेळण्याची दाट शक्यता आहे. त्याला साई सुदर्शनच्या जागी तिसऱ्या क्रमांकावर किंवा अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीच्या जागी खालच्या फळीत फलंदाजीसाठी उतरवले जाऊ शकते. भारतीय खेळपट्ट्यांवर संघाला रेड्डीच्या गोलंदाजीची फारशी गरज भासणार नाही.

### दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कुणाला मिळणार संधी?

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेला १४ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या मालिकेत ध्रुव जुरेल हा संघाचा भाग आहे, पण ऋषभ पंत दुखापतीतून सावरून पुन्हा उपकर्णधाराच्या जबाबदारीसह संघात परतला आहे. यामध्ये एक ट्विस्ट आला तो म्हणजे पंत सराव सामन्यादरम्यान दुखापतग्रस्त झाला व त्याने मैदान सोडले. त्यामुळे तो प्लेइंग इलेव्हनचा भाग असणार की नाही हे अद्याप निश्चित नाही. तो अनफिट असला तर ध्रुवला संघात संधी मिळेल, मात्र पंत फिट असेल तर ध्रुवला जागा मिळणार की त्याच्यावर बाकावर बसायची वेळ येणार ते पाहण्याजोगे असेल.

# वादळी फलंदाजी करीत आकाश चौधरीचा विक्रम

## ११ चेंडूंत अर्धशतक; सलग आठ चेंडूंवर ठोकले षटकार

**सुरत : वृत्तसंस्था**

सुरतच्या क्रिकेट मैदानावर शनिवारी मेघालयच्या आकाश चौधरी या फलंदाजाने एका नव्या विक्रमाची नोंद केली. आकाशने फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये केवळ ११ चेंडूंमध्ये अर्धशतक झळकावून इतिहास रचला आहे. या कामगिरीमुळे त्याने फर्स्ट क्लास क्रिकेटमधील सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे.



आकाश चौधरीच्या या खेळीचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने सलग आठ षटकार यामध्ये एकाच षटकात सलग सहा षटकार मारण्याचाही पराक्रम त्याने केला. रणजी ट्रॉफी सामन्यात अरुणाचल प्रदेशविरुद्ध मेघालयच्या डावातील १२६व्या षटकात गोलंदाज लिमर डाबी याच्याविरुद्ध त्याने हे सलग सहा षटकार लगावत खळबळ माजवली. त्याचे आक्रमक रूप पाहून विरोधी टीम हादरून गेली होती.

फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये एका षटकात सहा षटकार मारणारा आकाश चौधरी हा जगातील तिसरा आणि भारतातील दुसरा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी वेस्ट इंडिजचे गॅरी सोबर्स आणि भारताचे रवी शास्त्री यांनी हा पराक्रम केला होता. आकाश १४ चेंडूंमध्ये ५० धावा करून नाबाद राहिला.

किशोर-किशोर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# पुणे ग्रामीण, अहिल्यानगर, परभणीची अंतिम फेरीत धडक

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे ग्रामीण, अहिल्यानगर संघांनी किशोरी, तर गतविजेत्या परभणीने संघाने किशोर गटात ३६व्या किशोर-किशोर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली. अहिल्यानगर संघ प्रथमच किशोरी गटात अंतिम फेरीत दाखल झाला आहे.



पिंपरी चिंचवडच्या बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत कै. राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान संघ व विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या वतीन आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेच्या किशोरी गटाच्या उपांत्य फेरीत झालेल्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने नंदुरबारला ४६-२९ असे पराभूत करून अंतिम फेरी गाठली आहे. नंदुरबारने सुरवात पहिले चार गुण घेत झोकात सुरवात केली, पण नंतर मात्र ते ढेपाळले. पुणे ग्रामीणने दोन लोन देत पुर्वार्धात २५-१४ अशी आघाडी घेवून वर्चस्व प्रस्थापित केले. उत्तरार्धात तोच धडाका कायम राखत विजय मिळवला. मानसी गावडे, भारती राऊत पुणे ग्रामीण कडून तर वैष्णवी देवकाते, मोनिका देवकाते नंदुरबारकडून उत्कृष्ट खेळल्या. उपांत्य फेरीचा सामना दुसरा अत्यंत चुरशीने खेळला गेला. त्यात अहिल्यानगरने पहिल्या डावातील १४-१६ अशा पिछाडीवरून ३५-२९ अशी बाजी मारली. दोन्ही संघानी या सामन्यात एक-एक लोनची नोंद केली, पण ११ बोनस गुण घेऊन अहिल्यानगरने या सामन्यात विजय मिळवला. ज्ञानेश्वरी ढवण, फौजिया शेख यांच्या सर्वांगसुंदर चढाया व त्यांना श्रेया आडसुळ, विरा ठोंबरे यांची पकडीची मिळालेली साथ त्यामुळे नगरने शेवटच्या क्षणी बाजी पलटवली. सिद्धीका गंभिरे, शेजल काकडे, कावेरी पगार यांच्या पुर्वार्धातील जोश उत्तरार्धात कमी पडला.

किशोर गटातील पहिल्या उपांत्य फेरीच्या रंगतदार सामन्यात गतविजेत्या परभणी संघाने अहिल्यानगर संघावर ३५-३३ मात करीत अंतिम फेरी गाठली. विश्रांतीला परभणी संघ १३-२० असा सात गुणांनी पिछाडीवर होता. विश्रांतीनंतर आपला खेळ गतिमान करत परभणीने शेवटच्या क्षणी विजय साकारला. राहुल चव्हाण व विजय तारे यांच्या झंझावती चढाया त्यांना मिळालेली सुनील कुमार, दीपराज कांबळे यांची पकडीची भक्कम साथ त्यामुळे त्यांनी हा विजय साकारला. अहिल्यानगरकडून समर्थ हेळूदे, साईराज तागडे शिवम शेंडगे यांनी शेवटच्या क्षणापर्यंत शर्तीची लढत दिली, पण पहिल्यांदाच ते अंतिम फेरीपासून वंचित राहिले.

# महिला वर्ल्डकप फायनलमध्ये व्ह्यूअरशिपचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाने नवी मुंबईत दक्षिण आफ्रिकेला पराभूत करून पहिलेवहिले महिला वन-डे विश्वचषक २०२५ विजेतेपद पटकावलेला अंतिम सामना विक्रमी ठरला आहे. या सामन्याने भारतात डिजिटल व्ह्यूअरशिपचे मोठे विक्रम नोंदवले.



भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामना स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर १८५ दशलक्ष (१८.५ कोटी) दर्शकांनी पाहिला. हा आकडा २०२४च्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषक अंतिम सामन्याच्या व्ह्यूअरशिपएवढा आहे तसेच हा आकडा २०२५च्या आयपीएलच्या सरासरी दैनंदिन व्ह्यूअरशिपपेक्षा जास्त आहे. टीव्हीवर हा अंतिम सामना ९२ दशलक्ष (९.२ कोटी) दर्शकांनी पाहिला. हा आकडा २०२४च्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषक आणि २०२३च्या पुरुषांच्या वन-डे विश्वचषक (ज्यात भारत सहभागी होता) यांच्या अंतिम सामन्याच्या व्ह्यूअरशिपएवढा आहे.

अंतिम सामन्याचे ठिकाण असलेल्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर (नवी मुंबई)सुद्धा प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती. ३९,५५५ प्रेक्षकांनी मैदानात उपस्थित राहून भारतीय महिला संघाला इतिहास रचताना पाहिले. ५ ऑक्टोबर रोजी झालेल्या भारत विरुद्ध पाकिस्तान गट सामन्याने महिलांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी सर्वाधिक व्ह्यूअरशिपचा मागील विक्रम (२८.४ दशलक्ष) नोंदवला होता. हा विजय आणि दर्शकांचा प्रतिसाद महिला क्रिकेटची लोकप्रियता किती झपाट्याने वाढत आहे हे अधोरेखित करतो.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com